Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

# श्री नामदेव चरित्र

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

# श्रीनामदेव चरित्र

: लेखक :

प्रा. र. रा. गोसावी

सौ. वीणा र. गोसावी

: प्रस्तावना :

ह.भ.प.धुंडामहाराज देगलुरकर

: किंमत :

रुपये वीस फक्त

सारथी प्रकाशन, पुणे - ४११ ०३०.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रकाशक :
एम. आर. जोरी
सारथी प्रकाशन
१००५ सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०.

प्रसिध्दी :
सन २००५

सर्व हक्क प्रकाशकाधीन :

ऑफसेट छपाई :
रा. शं. जोरी
इंदिरा प्रिंटिंग प्रेस
१००५ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०.
फोन : ०२०-२४४७७३२९,
५६२४९१७०

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ह. भ. प धुंडामहाराज देगलूरकर

॥ श्रीपांडुरंग प्रसन्न ॥

# प्रस्तावना

तेही प्राणपरौते। आवडती हे निरुतें।
जे भक्तचरित्रातें। प्रशंसिती ॥ ज्ञानेश्वरी – १२.२२७ –

संतांची चरित्रे ही माणसाच्या मनावर चांगले संस्कार करणारे एक फार श्रेष्ठ साधन आहे. पुष्कळदा आपणास संतांची केवळ नावेच माहीत असतात किंवा फार तर त्यांनी केलेला एखादा चमत्कार. पण ज्या उच्चतम व वंदनीय अवस्थेपर्यंत ते पोहोचले त्यासाठी त्यांनी केलेले कष्ट, त्याग, दोष जिंकून त्यांनी संपादन केलेले गुण, त्यांचे कारुण्य, भूतदया, परमात्मनिष्ठा, सर्वांच्या हिताविषयी असणारी तळमळ, सर्वत्र भगवत्स्वरूप पाहणारी त्यांची व्यापक दृष्टी आणि मुख्य म्हणजे त्यांनी केलेला बोध याची ओळख फार थोड्या लोकांना असते.

ती ओळख सर्वांना व्हावी म्हणून सारथी प्रकाशनाने संतचरित्रांची मालिका छोट्या पुस्तकांच्या स्वरूपात काढली आहे त्यात प्रत्येक संतांचे चरित्र, कार्य, वाङ्मय, त्यांचा उपदेश याची अगदी थोडक्यात व सर्वांना समजेल अशा भाषेत मांडणी केली आहे. संतांचे जीवन समजावून घेण्यास या पुस्तकांचा चांगला उपयोग होईल.

देगलूर
ज्येष्ठ शु. ११, शके १९०५ — धुंडामहाराज देगलूरकर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

# प्रास्ताविक

## (पहिली आवृत्ती)

सकल संतचरित्रमालेतील दहा संतांच्या चरित्रांचा हा संच वाचकांच्या हाती देताना अवर्णनीय आनंद होत आहे. सुमारे वर्षापूर्वी माझे मित्र प्रा. न. म. जोशी यांच्याबरोबर मी पुण्यातील सारथी प्रकाशन संस्थेचे प्रकाशक आणि त्यांचे बंधू रा. शं. जोरी यांच्याकडे गेलो असता, त्यांनी महाराष्ट्रातील सर्व वारकरी संतांची चरित्रे लिहून देण्याची कल्पना माझ्यासमोर मांडली त्यावेळी चर्चा करता एकूण तीस वारकरी संतांची चरित्रे सुमारे ७५ ते १०० पृष्ठांची मर्यादा घालून लिहिता येण्यासारखी आहेत असे आढळून आले.

महिपतीसारखे प्राचीन संतचरित्रकार अपवाद म्हणून सोडले, तर सर्वच वारकरी संतांची चरित्रं एकत्रित किंवा स्वतंत्रपणे लिहिलेली आढळत नाहीत. काही मोजक्याच संतांची चरित्रं स्वतंत्रपणे लिहिलेली उपलब्ध होतात. कै. ल. रा. पांगारकर, कै. ज. र. आजगांवकरांसारख्या मोजक्या संतचरित्रकारांनी या आणि इतर संतांची–संतकवींची चरित्रं तीन भागात ग्रंथित केलेली आहेत. तथापि किमान ५० ते १०० पृष्ठांची मर्यादा घालून सुमारे तीस वारकरी संतांची चरित्रे स्वतंत्रपणे लिहिण्यासारखी असून वारकरी आणि इतर विठ्ठल-भक्तांच्या दृष्टीने हे काम उपयुक्त ठरणारे आहे, असे वाटल्यावरून श्री. जोरी यांना मी होकार दिला. दहा संतचरित्रांचा एक संच, असे तीन संच तयार करून द्यायचे ठरले.

मात्र याकामी माझ्या सुविद्य पत्नी सौ. वीणा गोसावी यांचे सहकार्य बरोबरीनें घ्यावे लागेल, ह्याची कल्पना त्यांना मी दिली. सौ. गोसावी यांनी घरच्या सर्व जबाबदाऱ्या सांभाळून या लेखनकार्यास बरोबरीनें हातभार लावला. त्यामुळे हे कार्य पार

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



पाडण्यात निम्मे अधिक श्रेय त्यांचे आहे. समाधान आणि आनंद वाटतो याचा की, दहा संतचरित्रांचा हा संच वाचकांच्या हाती आकर्षक स्वरूपात देता आला. प्रा. न. म. जोशी आणि प्रकाशक श्री. जोरी यांनी सतत प्रेरणा दिल्यामुळे हे कार्य पार पडले. त्यांचे मनःपूर्वक आभार मी सुरुवातीसच मानतो. डॉ. शं. गो. तुळपुळे आणि डॉ. प्र. न. जोशी या गुरुजनांचे आणि आप्तजनांचे आदर्श मला सतत प्रेरणा देत आले आहेत. त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करताना मनास धन्यता वाटू लागते.

सर्वच संतांची जीवने ऐहिक आणि पारमार्थिक जीवनांचे आदर्श समोर ठेवून घडलेली आहेत. त्यामुळे त्यांच्या जीवन चरित्रांतून या दोन्ही प्रकारच्या जीवनाचे श्रेष्ठ आदर्श आपल्याला प्राप्त होतात. तसेच त्यांचे अभंगवाङ्मय म्हणजे आत्मनिष्ठ भूमिकेवरून त्यांनी केलेला आत्माविष्कारच होय. त्यामुळे त्यांच्या ऐहिक आणि पारमार्थिक जीवनातील अनुभूती त्यांत उत्कटपणे व्यक्त झालेल्या आहेत. अशाप्रकारे परंपरा, आख्यायिका, प्राचीन-अर्वाचीन लेखकांची संतचरित्रं आणि त्यांचे अभंग–वाङ्मय आधाराला घेऊन ही संतचरित्रे सिद्ध झालेली आहेत. त्यांचे श्रेष्ठ जीवनादर्श आपल्यासमोर यावेत आणि त्यांच्या जीवनचरित्रातून शुद्ध नैतिक विचारांचे संस्कार आपल्याला प्राप्त व्हावेत, हाच त्यामागील हेतू होता.

सर्वच संतांच्या चरित्रात चमत्कारांचा आश्रय भरपूर केलेला दिसून येतो. परंतु एक ईश्वरी शक्ती ह्या दृष्टीने या चमत्कारांकडे न पाहता पुराणादी प्राचीन वाङ्मयाची अभिव्यक्तीची पद्धती त्यांनी आत्मसात केलेली होती, हे ध्यानात घेतले तर ह्या चमत्कारामागील मूळ हेतुपरंपरा आपल्या ध्यानात येईल आणि त्यातून श्रेष्ठ जीवनमूल्यांचेच दर्शन आपल्याला घडेल.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



दुसरे असे की, संतचरित्रकथांमागे लोकप्रतिभा काम करीत असते आणि त्यामुळे स्वाभाविकपणे काल्पनिक चमत्कारांचेच साम्राज्य त्यात अधिक असते. कारण संतांच्या अलौकिक वाटणाऱ्या व्यक्तिमत्वानं लोकमानसाची पकड घेतल्यावर ते लोकमानस त्या संतचरित्रांना आपल्या कल्पनेप्रमाणे आकार देत जाते आणि त्यामुळे संत हे अतिमानवी शक्तीशी नाते जोडलेले दाखविले जाऊ लागतात. अशाप्रकारे संतांच्या अलौकिक वाटणाऱ्या जीवनाविषयीच्या स्वाभाविक आकर्षणातून लोकप्रतिमा संतांच्या चरित्राकडे पाहू लागते आणि त्यातून अनेक कल्पनाबंध निर्माण होऊन अद्‌भुतरम्य आणि चमत्कारांनी परिपूर्ण अशा संतचरित्रांची निर्मिती होऊ लागते.

संतचरित्रातील चमत्कारांकडे वरील दृष्टिकोनातून पाहिले म्हणजे त्यातील शाश्वत सत्य तेवढे आपल्या हाती येते आणि खऱ्या परमार्थाशी ज्याचा काहीच संबंध नाही, असे हे चमत्कार अव्यक्तीचे एक माध्यम आणि लोकप्रतिभेचे एक अंग म्हणूनच केवळ आपल्यासमोर येतात.

वरील सर्व गोष्टी ध्यानात घेऊन ही संतचरित्रे वाचली, तर लोकजीवनाशी समरसून गेलेल्या, सर्मपित आणि सदाचार, सद्‌विचार संपन्न अशा श्रेष्ठ जीवनाचे आदर्श आपल्याला त्यातून प्राप्त होतील आणि आजच्या सत्ता आणि संपत्तीच्या स्पर्धेत आपण ज्या शाश्वत आनंदाला, मन:शांतीला पारखे झालो आहोत तो शाश्वत आनंद आणि मन:शांती आपणास प्राप्त करून घेण्यास मदत होईल असा विश्वास वाटतो.

श्रीराम मंदिर, शिरवळ (सातारा) } र. रा. गोसावी<br>सौ. वीणा गोसावी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

# श्री नामदेव चरित्र

## अनुक्रमणिका


भक्त नामदेव ९
नामदेवांचा जन्म १०
कुटुंबात जनाबाईचे आगमन १३
देवानं नैवेद्य खाल्ला १६
लौकिक जीवनात रस नाहीं २०
कुटुंबियांचा विरोध २५
ज्ञानदेवादी भावंडांची भेट २९
गोरोबा काकांचे थापटणे ३४
गुरुपदेश आणि निर्गुणानुभूती ४१
सद्‌गुरु विसोबा खेचर ४४
औंढ्यानागनाथ ४५
नामदेवांच्या जीवनात घडलेली क्रांती ४८
पारमार्थिक तळमळ ५१
आत्मनिरीक्षण आणि आत्मपरीक्षण ५४
देवाशी संघर्ष ५६
परमात्म-भेटीची पहाट ५९
भक्ती हीच अंतिम जीवननिष्ठा ६२
नामदेवांचा भक्तिमार्ग ६४
नामदेवांची नामभक्ती ६६
तीर्थयात्रा ६८
पंजाबातील कार्य ७०

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



| | |
|---|---|
| नामदेवाची पायरी हेच समाधिस्थान | ७२ |
| नामयाची अमृतवाणी | ७५ |
| पंढरपूर आणि श्रीविठ्ठल | ७९ |
| बालक्रीडेचे अभंग | ८१ |
| चरित्रकार नामदेव | ८६ |
| ग्रंथसाहेबातील नामदेव | ८९ |
| इतर हिंदी पदे | ९१ |
| नामदेवांची उपदेशवाणी | ९३ |
| सत्त्वसंपन्न वारसा | ९८ |
| आरती श्रीपांडुरंगाची | १०२ |



Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

# भक्त नामदेव

मराठवाडा. महाराष्ट्राचा एक वैशिष्ट्यपूर्ण भाग. मराठीचं माहेघरच ते. सातशे वर्षांपूर्वीपर्यंत महाराष्ट्रात यादवांचं राज्य होतं. हे यादवराजे द्वारकाधीश भगवान् श्रीकृष्णाच्याच वंशाचे. भिल्लम हा या यादवांतील पहिला पराक्रमी राजा. यानं त्याच्या पूर्वी १८ पिढ्या चालत आलेलं आपलं राज्यं विस्तारलं. त्याला साम्राज्याचं स्वरूप प्राप्त करून दिलं. या भिल्लमानंतर यादव-वंशात एकेक महापराक्रमी राजे होऊन गेले. भिल्लमानंतर स्थापन केलेल्या 'देवगिरी' या राजधानीनं मराठवाड्याला महाराष्ट्रात एक आगळंच वैभव प्राप्त झालं होतं. मराठवाड्यातील या देव-गिरीच्या साम्राज्याचा धाक सबंध महाराष्ट्रात आणि महाराष्ट्रा-बाहेरही होता. हेमाडपंत, बोपदेव, भास्कराचार्य असे महापंडित, गणिती, ज्योतिषी होऊन गेले या मराठवाड्यात. यादवांचा अखेरचा राजा रामदेवराय याच्या कारकीर्दीत महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन वैभवाच्या कळसाला पोचलं होतं. पैठण हे मराठवाड्यातलं महाराष्ट्राचं धर्मपीठ. या पैठणच्या विद्वान् ब्रह्मवृंदाला ज्ञानदेवांनी आपल्या पराक्रमाचं तेज दाखवलं. ते ज्ञानदेवही मराठवाड्यातील आपेगावचेच. गोदावरीनं या मराठवाड्याचं सांस्कृतिक जीवन घडवलं. प्राचीन महाराष्ट्राचा सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीय इतिहास या मराठवाड्यातच घडला.

'नरसीबामणी' हे मराठवाड्यातलंच एक सुलक्षणी गाव. मराठवाड्याची कूसच अशी, की तिथं महापुरुष जन्माला यावेत. जवळच 'औंढ्यानागनाथ' हे पाशुपतांच्या उपासनेचे प्राचीन

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



स्थान. किती शिवभक्तांनी शिवोपासना केली असेल या ठिकाणी ! गणनाच नाही त्याला. नरसीबामणी आणि औंढ्यानागनाथ यांचे अनुबंध शिवोपासनेमुळे प्राचीन काळापासून जुळून आलेले.

## नामदेवांचा जन्म

एका शिंपी कुटुंबाच्या काही पिढ्या या नरसीबामणीला नांद-लेलेल्या. दामाशेट हे त्याच घराण्यातला सत्वशील पुरुष. शिंप्याचा आणि कापड-चोपड विकण्याचा व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवीत होते. पंढरपूरची वारी कधी चुकली नाही. औंढ्यानागनाथ तर त्यांचं दैवतच बनलं होतं दुसरं. गोणाई ही त्यांची धर्मपत्नी. नरसीबामणीपासून दूर असलेल्या कल्याणी या गावातील बोमाजी शिंप्याची ही मुलगी. या दोघा पति-पत्नींना एक मुलगी होती. आऊबाई हे तिचं नाव. वंशाचा दीप नाही म्हणून पतिपत्नी निराश होते. दामाशेटी पंढरपूरला जात, तेव्हा विठ्ठलाला काकुळती येऊन नवस बोलत. आपली पत्नी पुत्रप्राप्ती नाही म्हणून खंतावलेली पाहिल्यावर ते जास्तीच अस्वस्थ होऊन जात. विठ्ठलाच्या उपासनेत खंड नव्हता. पहाटे उठून स्नान, देव-पूजा आणि नामस्मरण, मग उद्योगधंदा. दुपारी नैवेद्य दाखविल्या-शिवाय अन्नग्रहण नाही. रात्री शेजारती झाल्याशिवाय झोप नाही. काम करीत असताना अखंडपणे विठ्ठलाचं नामस्मरण.

दामाशेटीच्या आणि गोणाईच्या या अनुष्ठानाला फळ आलं. गोणाईला दिवस गेले. वंशाचा दिवा लागणार म्हणून दोघांची मनं उत्कंठित झाली होती.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



दामाशेटीं आणि गोणाई यांच्या जीवनात ती पहाट उगवली. पांडुरंगाचा प्रसाद शके ११९२ च्या कार्तिक शुद्ध एकादशीच्या शुभमुहूर्तावर त्यांच्या पदरात पडला. दामाशेटींचं कुळ पावन झालं. सर्वत्र आनंदी आनंद झाला.

सारेच संत, साक्षात्कारी सत्पुरुष हे देवरूप झालेले असतात आणि त्यामुळे त्यांची चरित्रं सांगताना सामान्य माणसाच्या लौकिक जीवनात घडणाऱ्या गोष्टी त्यांत सांगाव्यात असं भाविक मनाला वाटत नाही, रुचत नाही. देवरूप संताचा जन्म सामान्य माणसासारखा होतो असं वर्णन करणं त्या भाविक मनाला अवघड वाटतं. त्यातून संतसत्पुरुषांच्या जन्माविषयी अद्भुत कथा उदयास येतात. नामदेवांच्या जन्माविषयी संतचरित्रकार महिपतीबोवा यांनी अशीच एक अद्भुत कथा पुढीलप्रमाणे सांगितली आहे.

आता ऐका श्रोते सज्जन । क्षीरसागरीं नारायण ।
उद्धव-शुकासी पाचारून । म्हणे अवतार घेणें मृत्युलोकीं ।।
ते म्हणती पयोब्धिवासा । आम्हीं न जाऊं की गर्भवासा ।
अयोनिसंभव हृषीकेशी । जन्म देई आम्हांसी ।।
ऐसे ऐकोनि जगज्जीवन । बाह्य दिधलें त्या कारण ।
शुक्तिकेचें पोटीं घालुन । वर्षते घनीं टाकिलें ।।
एक पडला भागीरथींत । एक पडला भीमरथींत ।
प्रवाहें वाहत येत । स्मरण करीत तें ऐका ।।
शिंपला पडला भागीरथींत । तो रामराम स्मरण करीत ।
दुजा पडला भीमरथींत । तो विठ्ठल विठ्ठल म्हणत निज छंदे ।।
रामभजन करी तो शुक । उद्धव पांडुरंग उपासक ।
प्रवाहीं वाहता देख । काय कौतुक वर्तलें ।।

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



दामाजी शिंपी वैष्णवजन । परम भाविक पुण्यपावन ।
भक्तिज्ञान वैराग्य पूर्ण । त्याचें ठायीं असती की ।।
गोणाई त्याची कांता । परम भाविक पतिव्रता ।
पंढरींत राहती उभयता । श्रीजगन्नाथा आठवुनी ।।
पोटीं नाही पुत्रसंतान । गोणाई म्हणे पतीलागून ।
तुम्ही पांडुरंगापाशीं जाऊन । एक पुत्र मागावा ।।
मग महाद्वारासी जाऊन । देवासी केले साष्टांग नमन ।
म्हणे कांता इच्छी पुत्रसंतान । होई प्रसन्न श्रीहरे ।।
ऐसें बोलोनि वचन । निद्रा आली न लागता क्षण ।
स्वप्नीं येऊनि जगज्जीवन । म्हणें पुत्रदान तुज दीधलें ।।
दुसरे दिवशीं दामाशेटी । सत्वर आला भीमातटीं ।
स्नान करूनि उठाउठी । नित्यनेम सारिला ।।
तो भीमातटी वाहत । शिंपला अकस्मात् देखिला येत ।।
दामाशेटीनें जात जात । घेतला सत्वसर तेधवा ।।
उकलोनि पाहतां तये क्षणीं । तो लावण्यबाळ देखिलें नयनी ।
जैसें मातीच्या उदरांतूनी । याचि क्षणीं उपजलें ।।

या अद्भुताच्या माध्यमातून लोकमानसातील एक श्रद्धा प्रामुख्याने सूचित होते की, भक्त नामदेव हे पांडुरंगाचे थोर उपासक, उद्धवाचे अवतार आहेत.

घरात नव्यानं जन्माला आलेलं बाळरूप साऱ्यांच्याच कौतुकाचा विषय बनलं. सर्वांनी आपल्या हातांचा पाळणाच केला होता.

'बाळाचं नाव काय ठेवयायचं ?' गोणाईनं विचारलं.

'पांडुरंगाचा प्रसाद मिळाला आहे हा आपल्याला.' दामाशेट म्हणाले.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



आणि मग सर्वांच्या आवडीचं 'नामदेव' हे नाव ठेवण्यात आलं. विठ्ठलांच्या नामस्मरणाचा हा प्रसाद 'नामदेव' म्हणून ओळखला जाऊ लागला. बाल नामदेवाच्या मनावर लहानपणापासूनच घरातल्या धार्मिक वातावरणाचे संस्कार होऊ लागले. त्याचे बोवडे बोल विठ्ठलाचं नाम घेण्याचे प्रयत्न करू लागले.

## कुटुंबात जनाबाईचे आगमन

गोदावरीच्या काठी, मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यात 'गंगाखेड' म्हणून एक गाव आहे. तेथे दमा नावाचा एक शूद्र राहात असे. त्याच्या पत्नीचं नाव होतं करुंड. दमा हा भगवद्‌भक्त होता. करुंड ही पतिव्रता स्त्री होती. दमा नित्यनेमानं पंढरीची वारी करीत असे. अशारीतीनं त्यांचा संसार सुखानं चालला होता. पण त्यांना मूलबाळ नव्हतं त्यामुळे हे पति-पत्नी दुःखी होते. एकदा दमा आणि करुंड ही दोघं पंढरीस पांडुरंगाच्या दर्शनासाठी गेली. विठ्ठलाची करुणा भाकली आणि संतानप्राप्तीसाठी नवस केला. त्याच रात्री स्वप्नात दमाला श्रीविठ्ठलानं दृष्टांत दिला की, "तुला एक कन्या होईल. ती तुझ्या कुळाचा उद्धार करील. कृतयुगात ती पद्मिनी होती, त्रेतायुगात मंथरा होती आणि द्वापारयुगात कुब्जा होती. तीच तुझ्या पत्नीच्या उदरी जन्मास येईल. 'जनाबाई' असं तिचं नाव ठेव. भक्त नामदेवाच्या जीवनचरित्राशी तिचा संबंध येणार आहे. तिच्या हातून थोर कार्य होणार आहे. तरी नामदेवाचे पिताजी दामाशेटी यांना आपली ही मुलगी सांभाळण्यासाठी दे.'

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


कालांतरानं करुंड गर्भवती झाली. नऊ महिने पूर्ण भरताच ती प्रसूत झाली. तिला मुलगी झाली. संकेताप्रमाणे तिचं नाव 'जनाबाई' असं ठेवण्यात आलं मुलगी दिसामासानं, वर्षानं वाढत होती. तसे दमा आणि करुंड यांच्या भक्तिमार्गाचे संस्कार तिच्यावर होत होते. अशा रीतीनं मुलगी पाच-सहा वर्षांची झाली. आता श्रीविठ्ठलाच्या आदेशाप्रमाणे दामाशेटाच्या स्वाधीन तिला करणं भाग होतं. एके दिवशी दमा दामाशेटींच्या घरी नरसीबामणीस तिला घेऊन आला.

'दामाशेटी आहेत का घरात ?' दामाशेटी बाहेर आले.

'होय, मीच दामाशेटी. काय हवं आहे आपल्याला ?'

'काहीं नको. आपलंच आहे ते आपल्याला द्यायला आलोय!'

'समजलं नाही मला आपल्याला काय म्हणायचं आहे ते ?'

'तेच सांगतो बघा!' दामाजींनी त्यांना बसायला सांगितलं. दमा बोलू लागला.

'माझं नाव दमा. गंगाखेडहून आलोय् मी. ही माझी लेक जनाबाई हिचं नांव. हिला आपल्या चरणी अर्पण करायला आलोय् !'

'आपली लेक, आणि मला कशासाठी अर्पण करता ?' दामाशेटींनी गोंधळलेल्या अवस्थेत प्रश्न केला.

दमानं त्यांना सारी हकीगत सांगितली आणि म्हणाला,

'दामाजी, मी खाऊन–पिऊन सुखी आहे. विठ्ठलाच्या कृपेनं ही लेक मला जड नाही. माझ्या काळजाचा तुकडाच तो. तिची आई फार फार कष्टी झाली तिला निरोप देतांना. दोघांचं काळीज तुटलं. पण दोघांनीही ठरवलं की ईश्वरी संकेत मोडायचा नाही आणि म्हणून देवाची आज्ञा घेऊन आलोय् आपणाकडं !'

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


दमाचं भक्तिभावपूर्ण अंतःकरण, ईश्वरनिष्ठा आणि लेकीसाठी तिळतीळ तुटणारं अंतःकरण पाहून दामाशेटींना त्याची करुणा आली, त्याच्या बोलण्यातली सत्यता पटली आणि त्याच्या पाठी-वरून हात फिरवून दामाशेटींनी म्हटलं –

'दामाजी, वाईट वाटून घेऊ नका. मुलीचा त्याग केव्हा तरी करावाच लागतो आईबापांना. तुम्हाला या रूपानं श्रीविठ्ठलानं असा त्याग करायला सांगितलं, हा ईश्वरी संकेत काही वेगळंच घडवून आणणार आहे. तिच्या हातून फार मोठं कार्य होणार आहे. मोठी तेजस्वी दिसते मुलगी. आता ही माझीच मुलगी आहे असं समजा.'

दमानं दामाशेटींच्या पायांवर डोकं ठेवलं आणि स्फुंदत स्फुंदत जड अंतःकरणानं निघून गेला.

दामाशेटी नजरेआड होईपर्यंत त्याच्याकडे पाहात होते.

आता जनाबाई आणि नामदेव ही दोघं भावंडांप्रमाणं घरात वावरत होते. दामाशेटींच्या विठ्ठलभक्तीचे संस्कार त्यांच्या मनावर दृढ होऊ लागले. देवाला नैवेद्य दाखविल्याशिवाय लहान मुलंही जेवण घेईनाशी झाली.

## देवानं नैवेद्य खाल्ला

नामा आता चांगला सहा वर्षांचा झाला होता. तो रोज पाहात असे की, आपल्या घरून देवाला नैवेद्य जातो. एके दिवशी त्यानं आईला सांगितलं की, आजपासून मी नैवेद्य नेणार. आईलाही त्याचं कौतुक वाटलं आणि तिनं नैवेद्य तयार करून नामाबरोबर दिला.

नामाला वाटलं देव नैवेद्य खातो. त्यानं देवापुढं नैवेद्य ठेवला

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



आणि वाट पाहात बसला. आत्ता देव येईल, मग येईल. पण बराच वेळ झाला, देव आलाच नाही. काय करावं समजेना. शेवटी तो देवाला म्हणाला —

‘देवा, नैवेद्य आणला आहे, केव्हा खायला येणार ?’

उत्तर नाही.

‘देवा, मला किती वेळ वाट पाहायला लावणार ? उशीर झाला तर आई रागावेल ना. लवकर ये आणि नैवेद्य खाऊन जा.’

तरीही उत्तर नाही.

‘देवा, घरची मंडळी वाट पाहात असतील. मी एवढा उन्हाचा आलोय् अन् तू नैवेद्य का खात नाहीस ? माझ्यावर रागावलास काय ? तू नैवेद्य खाल्ला नाहीस, तर मला वाईट वाटेल.’

उत्तर नाही. आता नामा फार अधीर झाला होता. देव रोज नैवेद्य खातो अन् आज आपण आणला म्हणून खात नाही काय ? त्याला देवाचा राग आला. आपलं काही चुकलं तर नसेल ना त्याचे डोळे पाणावले. तो व्याकुळ होऊन म्हणाला —

‘देवा, मी खरंच आंघोळ करून आलोय्. येताना नैवेद्य झाकून आणलाय्. त्याला शिवलोसुद्धा नाही. मग का खात नाहीस ? हे बघ, तू जर नैवेद्य खाल्ला नाहीस तर तुझ्यापुढं मी डोकं आपटून घेईन !’

देवाकडून काहीच प्रतिसाद नाही, हे पाहून नामा खरोखर डोकं आपटून घेण्यासाठी खाली वाकला. तोच त्याला गाभाऱ्यात एकदम प्रकाशच प्रकाश दिसला. त्यानं डोकं वर करून पाहिलं, तोच त्याला देवाच्या मूर्तीतून देव अवतरलेला दिसला. तेजःपुंज

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



मूर्ती, डोईवर रत्नजडित मुगुट, पीतांबर, अंगावर उपरणं अशा थाटात अवतरलेला देव नामानं पुढं ठेवलेला नैवेद्य खात होता. नैवेद्य खाऊन झाल्यावर देव अंतर्धान पावले.



देवानं नैवेद्य खाल्यावर नामा घरी आला. आई केव्हाची वाट पाहात होती. तिला नामाच्या हातातलं ताट रिकामं दिसलं. तिनं विचारलं –

‘ नामा, नैवेद्य कुठं आहे ? ताट रिकामं कसं ? अरे वेड्या देवाचा नैवेद्य तूच खाल्लास काय ? ’

‘ नाही आई, नैवेद्य देवानंच खाल्ला.’

‘ नामा, असं करू नाही. अन् खोटं बोलू नाही कधी. खरं सांग, नैवेद्य दाखवून झाल्यावर खाल्लास, का आधीच ? ’

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



हा हा म्हणता ही बातमी सर्वत्र पसरली. बालपणीच नामदेव भक्त नामदेव म्हणून लोकांच्या कौतुकाचा, आदराचा विषय झाले.

## लौकिक जीवनात रस नाही

नामदेवाच्या मनात परमात्मभक्ती जन्मतःच रुजलेली होती. बालवयात परमेश्वर म्हणजे काय याविषयी काहीच कल्पना नसणं अगदी स्वाभाविक असतं. पण नामदेव मात्र एखाद्या थोर भक्ता-सारखा लहान वयातच परमेश्वराची भक्ती करू लागला. घरच्या कामात त्याचं लक्ष कधीच नसायचं. सदान्कदा देवाच्या देवळात भजन म्हणत बसणं किंवा नामस्मरण करीत बसणं, हाच एक ध्यास लागून राहिला होता. गोणाई किंवा दामाशेट हे कितीही भक्त असले तरी त्यांना प्रपंचाची काळजी होतीच. त्याच्या वयाची इतर मुलं आईवडिलांना मदत करू लागली आहेत, ती त्यांच्या हाताशी आली आहेत असं पाहून नामदेवानंही आता घरात लक्ष घालायला पाहिजे, असं त्यांना वाटू लागलं. अनेकदा नामाला जबाबदारीची जाणीव द्यायचा प्रयत्न करून पाहिला. गोडीनं सांगून पाहिलं, दुसऱ्यांची उदाहरणं दिली, थोडाफार धाकही दाखवून पाहिलं, पण नामाचं लक्ष घरात लागेना. दिवसेंदिवस त्याची विठ्ठलभक्ती वाढतच राहिली. त्याचा अधिकाधिक वेळ देवळातच जाऊ लागला. आईवडील हताश झाले.

शेवटी एक उपाय सुचला. नामाच्या वयातल्या इतर मुलांची लग्नं झालीत. नामाच्याही गळ्यात जबाबदारीचा पाश अडकवला

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



म्हणजे येईल आपोआप ताळ्यावर, या कल्पनेनं त्याचं लग्न लावून द्यायचं आणि त्याला संसारात अडकवून ठेवायचं निश्चित झालं.

गोविंदराव सदावर्ते यांची आठ वर्षांची मुलगी वधू म्हणून निश्चित झाली. तिचं नाव 'राजाई.' एका शुभमुहूर्तावर या वधूवरांचं लग्न लावून दिलं. गोविंदराव सदावर्तेंना चांगल्या कुटुंबातला आणि सदाचारी जावई मिळाल्याचा आनंद झाला. दामाशेटी आणि गोणाई सूनमुख पाहून आनंदित झाले. आपली जबाबदारी संपली. आता उभयतांनी एकमेकांना सांभाळून प्रपंच करावा, या कल्पनेनं दोघांना सुटकेचा आनंद झाला.

चार दिवस लग्नाच्या धामधुमीत गेले. नामा, जनाबाई आणि इतर सर्वजणी त्या आनंदात सामील झाले. वडीलधाऱ्यांना वाटलं, आता नामाला प्रपंचाची गोडी वाटू लागेल. पण चार दिवस गेल्या-नंतर नामाचा नित्याचा दिनक्रम पुन्हा सुरू झाला. भजन, नाम-स्मरण बहुतेक सर्व वेळ देवाच्या देवळात. घराच्या कामात, व्यव-हारात लक्ष घालणं नाही. कोणाची विचारपूस नाही, की कोणाची काही जबाबदारी आपल्यावर आहे याचं भान नाही. सदानूकदा विठ्ठलभक्ती ! दामाशेटी आणि गोणाई निराश झाले. पुन्हा त्याला उपदेश करून पाहिला. प्रपंचाच्या जबाबदारीची जाणीव देऊन पाहिली. इतर मुलांची उदाहरणं देऊन पाहिली. पण कशाचा उपयोग झाला नाही. एकदा दामाशेटींनी त्याच्यावर व्यवहाराची, कामधंद्याची जबाबदारी सोपवायचं ठरवलं. त्याला हाक मारली आणि म्हणाले —

' नामा, इकडे ये पाहू. तुझा पोरकटपणा अजून संपलेला

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



दिसत नाही. लग्न होऊनही तू काहीच कामधंदा करीत नाहीस, घरकामात लक्ष घालत नाहीस, कोणाचीही वास्तपुस्त करीत नाहीस. व्याही मंडळी आम्हांला काय म्हणतील ? लोक तुझ्या विषयी आणि आमच्याविषयी काय बोलतील याची जाणीव तरी आहे का तुला ? ऊठसूट देवालय गाठायचं आणि हातात वीणा अन् चिपळ्या घेऊन देवदेव करत बसायचं, हे चांगलं आहे का ? आम्हाला का देवभक्ती नको आहे ? आम्हीही देवाचं केलंच की. पण प्रपंच सांभाळून. तुला लहानाचा थोर करून. आता तुला घरचे व्यवहार पाहायला हवे. उद्यापासून तूच बाजाराला जायचंस. माझा धंदा पाहायचास. '



दामाशेटींनं आपला सर्व उदीम-व्यापार नामदेवाच्या स्वाधीन केला आणि इथून पुढं त्यानंच बाजाराला जायचं ठरलं.

नामदेव एकदा शेजारच्या गावी बाजाराला गेले. खांद्यावर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



गाठोडं, मुखात नामस्मरण. बाजाराच्या गावी आले. बरोबरच्या व्यापाऱ्यांचं कापड विकलं जात होतं. नामदेव परमेश्वराच्या चिंतनात, नामस्मरणात गुंग होते! कोणी आलाच कापड घ्यायला तर ते गिऱ्हाईक उधारीचं. नामा त्यांना उधारीनं कापड देऊ लागला. असाच एक 'गणोबा' नावाचा लबाड माणूस त्याच्या जवळ आला. आपली नड गयावया करून सांगितली. नामदेवाला दया आली. गणोबाला कापड उधारीनं दिलं. गणोबा असा लबाड होता की, त्यानं भोळ्या नामदेवाजवळ गहाण म्हणून एक दगड ठेवून दिला. नामदेव घरी दगड घेऊन आले! दामाशेटींनं विचारलं—

'नामा, किती व्यापार झाला?'

'बरचसं कापड विकलं. पण उधारीनं.'

'कुणाला?'

'गणोबाला.'

'त्यानं गहाण काय ठेवलं?'

'हा काय दगड. ठेवलाय माजघरात मी.'

दामाशेटींनी कपाळावर हात मारून घेतला. आपण उधारी पोटी दगड ठेवून घेतला यात आपलं काही गैर झालं असं नामाला वाटलंच नाही. दामाशेटींनी नामदेवांना तावडतोब उधारीचे पैसे घेऊन यायला सांगितलं. नामदेवांचा नाइलाज झाला. पुन्हा गणोबाकडं आले.

'गणोबा, माझे उधारीचे पैसे देऊन टाका.'

'माझ्याजवळ पैसा नाही. मी दगड गहाण ठेवलाय, तो तुझ्याजवळ असेपर्यंत पैसे मागायचे नाहीत.'

'मी तुझा दगड आणून देतो.'

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



'जा, आण.' त्याला वाटलं, कसचा आणतोय हा!

नामदेव घरी आले. पैसे आणले नाहीत हे पाहून दामाशेटी रागावले. नामदेव आत जाऊन दगड आणणार तोच दामाशेटी आत गेले व रागारागानं तो दगड उचलून बाहेर फेकला. तो काय? दगड सोन्यासारखा चमकू लागला. सर्वांना अचंबा वाटला. दामाशेटी म्हणाले—

'नामा उचल, उचल दगड. आत ठेवून दे. लोक पाहतील.'

नामा स्वस्थ. काही लोक हे पाहात होते. त्यांनी ही घटना गणोबाला सांगितली. गणोबा 'माझा दगड, माझा दगड' करीत धापा टाकत आले. म्हणाले—

'तो दगड माझा आहे, मी गहाण ठेवला आहे. देऊन टाका मला.'

दामाशेटी काही ऐकेनात. ते संतापून म्हणाले—

'मूर्खा, साधा दगड गहाण ठेवून आमच्या भोळ्या नामदेवाला फसवतोस आणि पुन्हा आमच्या घरातला हा सोन्याचा दगड मागतोस? लाज नाही वाटत तुला?'

नामदेवांनी मध्येच तोंड घातलं—

'नाही बाबा, हा दगड गणोबाकडूनच मी आणलाय. कापडाचे पैसे घ्या अन् देऊन टाका त्याचा त्याला. गणोबा दे पैसे अन् उचल दगड!'

गणोबानं कापडाचे पैसे देऊन टाकले आणि दगड घेऊन जायला अधीरतेनं हात लावला. गणोबाचा स्पर्श होताच तो सोन्याचा दगड पूर्ववत् झाला! गणोबाचं तोंड हिरमुसलं. तो खजील होऊन निघून गेला. नामाचे पैसे नामाला मिळाले! असा हा नामाचा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



व्यापार. जो देवाच्या नामाचाच सदैव व्यापार करतो, त्याची सारी संकटं देव पार करतो.

## कुटुंबियांचा विरोध

मराठीत नामदेवांनीच प्रथमच आत्मचरित्र लिहिलं. ते संपूर्ण नसलं तरी त्यांच्या जीवनातील तीन प्रमुख घटनांचं दर्शन त्यातून उत्कटपणे होतं. त्या घटना म्हणजे कुटुंबाचा त्यांच्या देवभक्तीस होणारा विरोध, त्यांची आणि ज्ञानदेवादी भावंडांची पाहिली भेट आणि विसोबा खेचरांचा उपदेश.

नामदेवांना भक्तीशिवाय अन्य कोणत्याही गोष्टीत रस वाटत नव्हता. अहोरात्र नामस्मरण हाच त्यांचा प्रमुख व्यावसाय बनला होता. वृत्तीनं ते शिंपी होते. पण शिंप्याची ही वृत्ती परमार्थमय कशी झाली होती, त्याचं त्यांनीच फार सुंदर वर्णन केलं आहे. ' शिव ' या शब्दावर श्लेष साधून आपल्या शिवण्याच्या धंद्याचं ते वर्णन करतात —

शिंपीयाचे कुळीं जन्म मज आला ।  
परि हेतु गुंतला सदाशिवीं ॥  
रात्री माजीं शिवीं दिवसामाजीं शिवीं ।  
आराणुक जीवीं नाही माझ्या ॥  
सुई आणि सुतळी, कात्री गज दोरा ।  
मांडिला पसारा सदाशिवीं ॥  
नामा म्हणे शिवीं विठोबाची अंगी ।  
त्याचेनि मी जगीं धन्य जालों ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



अशाप्रकारे नामदेवांचा अवघा कामधंदा म्हणजे देवभक्ती एवढाच बनला होता.

नवसाचा एकुलता एक मुलगा, वंशाचा दिवा. घरात दुसऱ्याची पोर सून म्हणून आणलेली. पण नामदेवाला घराची ओढ म्हणून राहिली नव्हती. त्याला प्रपंचात ओढण्यासाठी, कामधंद्यात लक्ष घालण्यासी दामाशेटी, गोणाई आणि राजाई यांनी हरतऱ्हेचें प्रयत्न करून पाहिले. पण शेवटी निराशाच पदरी पडली. आई-वडिलांचा जीव व्याकुळ होऊ लागला. चारचौघांसारखा प्रपंचा-कडे न पाहता नामदेव हाती टाळ घेऊन अहोरात्र राऊळी नाचतो, हे पाहून आता ते परोपरीनं त्याला बोल लावू लागले होते. घरात आता संघर्षाचं वातावरण निर्माण झालं होतं. 'या विठोबानं नाम्याला पिसं लावलं आणि आपल्या संसाराचं वाटोळं केलं' या शब्दांत गोणाई आपला विठोबाविषयीचाही राग व्यक्त करू लागली. नाम्याला तिखट आणि फटकळ भाषेत गोणाई बोलू लागली —

'नाम्या, तू आता हे देवपिसे सोड. घरदाराचं वाटोळं होऊ लागलंय तुझ्या या देवदेव करण्यानं. अरे, हा देव घरघेणा असून त्याच्या नादाला जे लागतात ते आपल्या संसाराला मुक-तात, त्यांना आप्तांची माया राहात नाही. स्वरूप दाखवून फितवणाऱ्या या देवाचा संग बरा नाही. याच्या संगतीने प्रपंचावर निखारे ठेवले जातात, हाती भिकेचा भोपळा येतो. असा हा देव भेंद आहे, कपटी आहे.'

'नाम्या इतरांच्या मुलासारखा तू मोठा संसार कर-शील अशी आमची आशा होती. पण तू आमची निराशा केलीस!'

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



'आणि देवा, तुही मला नामदेवासारखाच दिसतोस. आम्ही अनाथ शिंपी शिवणे टिपणे करून पोट भरत होतो, पण देवा तुला हे पाहवलं नाही. आमचा संसार तू कुळासकट बुडवलास! लोक तुला सर्वांगसुकुमार म्हणतात, दयाळू म्हणतात, पण तुझं हृदय तर दगडाहूनही कठीण दिसतं! म्हणूनच आमच्यासारख्या गरिबांचा घात करून तू आमच्या संसाराची वाताहात करशील! देवा तुझं दर्शन म्हणजे जीविताची हानी. छान केलंस, चांगलं देवपण दाखविलंस तू आम्हाला!'

गोणाई कितीही टाकून बोलली देवाला, तरी पोटी प्रेमाचे, भक्तीचे पाझर आटलेले नव्हते. तिचे हे बोल वरचेवर होते. तिची विठ्ठलभक्ती पुन्हा उचंबळून आली. ती विठ्ठलाला काकुळतीनं विनवू लागली—

'देवा, आम्ही तुझीच पाळिली—पोशिली आहोत, तेव्हा आमच्या सुखाचं निधान म्हणजे आमचा हा नाम्या आम्हाला परत करून जीवदान दे. नाहीतर मी आपला गळा तुझ्या चरणाशी करकचून बांधीन आणि प्राण सोडीन. देवा! मी तर आपल्या देहाचा संकल्प करून, घरादारावर पाणी सोडून आले आहे तुझ्या दारी. आता तुझ्या पायी एकतर जीव देईन किंवा नाम्याला तरी परत नेईन.'

नामदेवाच्या वडिलांनी पोटी अपार भक्ती ठेवून देवाला याही-पेक्षा तिखट बोल लावले. आपला शिवण्या—टिपण्याचा धंदा आणि प्रपंच सोडून पंढरीला येऊन टाळ कुटत बसलेल्या देवपिशा नाम-देवाला आणि भक्ताला आपलं वेड लावणाऱ्या विठोबाला ते म्हणाले —

'नाम्या, तू भक्त धडफुडा आणि तुझा हा देव निधडा. तेव्हा तुम्हा दोघांचा जोडा चांगला जमलाय म्हणायचा! तू मोठा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



होशील आणि कुळाचं नाव राखशील अशी आशा धरून होतो आम्ही. पण तुला 'खांदीये भोपळा आणि गळां तुळशीमाळा' च मानवल्या म्हणायच्या ! असो. कर्मगतीच म्हणायची ! !'

नामयाची पत्नी राजाई, ही जास्तीच वैतागून गेली होती. आणि ते बरोबरही होतं. घरातील पंधरा माणसांचा प्रपंच ओढायचा होता तिला. या प्रापंचिक ओढाताणीत 'खाया ना जेवाया, लेया ना नेसाया' अशी तिची अवस्था झाली होती. ती उद्वेगानं देवाला बोल लावू लागली—

लावोनि लंगोटी जालेति गोसावी ।
आमुची ठेवाठेवी कोण करी ॥
ऐसी तुमची स्थिती विलग देखोनि ॥
पडिलें चिंतवनीं काय करू ॥
सुखाचा संसार करोनि बारा वाटे ॥
नांव केलें मोठें जगामाजीं ॥
सर्वस्वें सांडोनि धरिला तुम्हीं देव ।
येणें पुसिला ठाव संसारींचा ।
आमुची करुणा न वाटेचि कांहीं ।
विनविते राजाई नामदेवा ॥

नामदेवांना कुटुंबियांची ही स्थिती, त्यांना भोगाव्या लागणाऱ्या मानसिक यातना पाहून गहिवरून येई. आपल्यामुळे त्यांना दुःख भोगावं लागत आहे, याची त्यांना खंत वाटे. पण त्याला त्यांचा नाइलाज होता. ते आपल्या अंतःप्रवृत्तीविरुद्ध वागू शकत नव्हते. आपल्या मनाविरुद्ध वागणं हे सच्चा दिलाच्या माणसाला अवघड जातं; आणि म्हणून त्यांनी आईपुढं आपलं अंतःकरण मोकळं केलं.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


'आई, मला देहाचे कोठलेही विकार मोहवीत नाहीत. मी या देहाला विटलो आहे. अशा परिस्थितीत मी विठ्ठलाचा छंद घेतला, यात काय बरं माझं चुकलं? आई, खरं सांगू? पुत्रप्रेमामुळे तू मोहित झाली आहेस, आणि त्यामुळे अंतर्बाह्य पाहून निघालेल्या माझ्या मनाची तुला कल्पना येत नाही. तू प्रेमळ आई आहेस, पण त्या प्रेमाच्या मोहामुळं तू मला पुन्हा संसारात खेचून एक-प्रकारे विषाचं गरळच पाजीत आहेस, हे तुला समजत नाही. पण आता खरंच सांगतो, आता एका पांडुरंगावाचून मला कोणीही जीवांचा जिवलग राहिला नाही.

'आई, माझ्या विठोबानं माझ्यावर किती उपकार केले आहेत म्हणून सांगू? माझी जातकूळ त्यानं विचारली नाही. माझा त्यानं अंगिकार केला. तो माझे हवे ते लळे पुरवतोय्. सांगितल्याविना माझ्या हृदयीचं गुज तो ओळखतो, मला अभयदान देतो, मला धीर देतो, शाश्वत आनंद देतो, तोच माझा मायबाप आहे. आई, माझ्या ठायीचे तुझे प्रेम तू एक वेळ विठोबाचे ठायी लाव. मग तुला खऱ्या सुखाची, आत्मसुखाची गोडी लागेल. त्या सुखापुढं सारी सुखं तुच्छ वाटू लागतील.'

नामदेवांच्या आई-वडिलांनी नामदेवांपुढे आता हात टेकले होते. पत्नीनं आपलं सर्वस्व आता विठोबावरच सोपवलं होतं.

## ज्ञानदेवादी भावंडांची भेट

नामदेव आता थोर भक्त म्हणून मानमान्यता पावले होते. त्यांच्या भक्तीची ख्याती सर्वत्र पसरली होती. पंढरी आणि पंढ-

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



रीचा पांडुरंग यांना सोडून एक क्षणभरही राहणं त्यांना अशक्य झालं होतं; आणि म्हणून त्यांचं सारं कुटुंबच पंढरपूरला येऊन राहिलं होतं. पांडुरंगाच्या सगुणोपासनेत त्यांचा सारा वेळ जात होता. विठ्ठलमूर्ती डोळ्यांसमोर असल्याशिवाय क्षणभरही त्यांना चैन पडेनासं होत होतं. त्यांच्या मनाची ही अवस्था इतक्या थराला जाऊन पोहोचली की, पंढरपूरच्या विठ्ठलमंदिरातील विठ्ठल मूर्ती म्हणजेच देव. तो आपल्याशी बोलतो, आपला सखा म्हणून सगुण रूपानं आपल्याला भेटतो, अशा समजुतीत ते समाधान मानू लागले होते. याचा अर्थ हाच होतो की, देवाच्या विश्वात्मक निर्गुण, निराकार, अनादी, अनंत अशा स्वरूपाचं त्यांना ज्ञान नव्हतं. त्यामुळे हा भोळा, अज्ञानी भक्त परमेश्वराचं सगुण रूप उराशी कवटाळून बसला होता. त्यांची भक्ती उत्कट होती पण आंधळी राहिली होती. याचा परिणाम असा झाला की, अज्ञानामुळे त्यांच्या ठिकाणी अहंकार निर्माण झाला. देवाचा सतत सहवास प्राप्त झालेला मी एक थोर भक्त आहे, अशी अहंभावना ते सतत उराशी बाळगू लागले. या भावनेचा उद्रेक एका प्रसंगी झाला. खरं म्हणजे या प्रसंगी त्यांच्या अहंकाराचा उद्रेक झाला म्हणूनच त्यांना परमात्मस्वरूपाचं खरं ज्ञान झालं.

ज्ञानदेवादी भावंडं नेवाशाहून पंढरपूरला आली होती. नेवाशास गीताभाष्याच्या रूपानं केलेल्या धर्मकीर्तनामुळे त्यांची ख्याती आता सर्वत्र झाली होती. संन्याशाची मुलं म्हणून होणारी मानहानी, होणारा छळ आता मिटला होता. लोक त्यांना अवतारी सत्पुरुष मानू लागले होते. पंढरपूरला आल्यावर विठ्ठलमंदिरात जाऊन त्यांनी श्रीविठ्ठलाचं दर्शन भारल्या अंतःकरणानं घेतलं.

पांडुरंगाला उराउरी भेटण्याच्या आनंदाचा सोहाळा अनुभवला

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


आणि ही भावंडं मंदिराबाहेर आली, तोच त्यांना चंद्रभागेच्या वाळवंटात एक कोणीतरी सत्पुरुष कीर्तन करीत असलेला आणि त्याच्या भोवती असंख्य भक्तांची गर्दी झालेली दिसली. ज्ञानदेवांनी निवृत्तिनाथांना विचारलं –

'दादा, कोणाचं कीर्तन चाललं आहे ? केवढा जनसमुदाय जमला आहे पहा येथे. जाऊया का आपण तिथं ?'

'खरंच दादा, आपण जाऊया तिथं. त्यांचा स्वरन् स्वर कसा भक्तीनं भिजून गेलाय !' सोपाना म्हणाला.

नामदेव नामसंकीर्तनात रंगून गेले होते. ते नाचत होते, गात होते, निरूपण करत होते. आत्म्याला लाभलेल्या सुखाच्या सुखाचं वर्णन करताना म्हणत होते –

'धन्य माझा जन्म । धन्य माझा वंश ।
धन्य विष्णुदास । स्वामी माझा ॥
काम धाम माझें । केशवाचे पायी ।
निशिदिनी पायी । हरपली ॥
शुकसनकादिक । जेणे सुख झाले ।
तें सुख राहिलें । माझ्या मनी ॥
नामा म्हणें जगी । लाभ अलभ्य झाला ।
हरि सापडला । विटेवरी ॥'

'ज्ञानदेवा, सोपाना, हेच ते नामदेवमहाराज होत. थोर भक्त आहेत ते. प्रत्यक्ष पांडुरंगाला त्यांनी आपल्या अंकित ठेवलं आहे. चला आपण जाऊया त्यांच्या दर्शनाला !' निवृत्तिनाथ म्हणाले.

एव्हाना नामदेवांचं 'हेचि दान देगा देवा' झालं होतं. कीर्तन आटोपलं होतं आणि श्रीविठ्ठलाची आरती चालली होती. अनेका-

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


नेक लोक नामदेवांच्या पायी मस्तक ठेवून नमस्कार करीत होते. आरती संपली.

निवृत्तिनाथांनी नामदेवांना नमस्कार केला. पाठोपाठ ज्ञानदेवांनीही विनम्र होऊन नमस्कार केला. नंतर सोपानदेव नमस्कार करून म्हणाले –

'आपल्या रूपानं आमुची मायबापं भेटली आहेत आम्हाला !'

नामदेवांनी त्या तेजस्वी मुलांना विचारलं –

'आपण कोण ? कोठले ?'

'आम्ही आळंदीचे. हा माझा धाकटा भाऊ ज्ञानदेव, तो सोपाना. अगं मुक्ताबाई, नमस्कार कर ना नामदेव महाराजांना !'

मुक्ताई पुढं आलीच नाही. आपली भावंडं नमस्कार करताहेत. पण हा ताठ मानेन उभा. प्रतिनमस्कारानं नमस्कार घेण्याइतका विनम्र भावही नाही याच्याजवळ. हा कसला थोर भक्त ? असे विचार मनात येत होते. ती एकटक त्यांच्याकडं पाहात त्यांच्या अंतरंगाचा ठाव घेत होती. ती एकदम फणकारली —

'दादा, तुम्ही समजता इतका मोठा नाही हा !'

सर्वजण चपापले. नामदेव गोंधळून गेले. निवृत्ति-ज्ञानदेवाची कीर्ती त्यांनी ऐकली होती. अशी ही तेजस्वी भावंडं आपल्याला विनम्र होऊन नमस्कार करतायत् याचा त्यांना अभिमान वाटत होता, अहंकार जागृत झाला होता. 'मी आणि ही तेजस्वी भावंडं दोघंही भक्तच आहोत. पण मला नित्य देवाचा शेजार आहे, तेव्हा त्यांनी मला नमस्कार करणं योग्यच आहे. माझा तसा अधिकार आहे. मग मी का म्हणून नमस्कार करावा यांना ?' या अहंकारानं नामदेव ताठ राहिले. पण आत कुठंतरी मुक्ताईच्या बोलानं

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

जखम झाली होती. 'ही चिमुरडी पोर असं का बोलून गेली ?' या विचारानं नामदेव क्षणभर अस्वस्थ झाले; आणि वरवर स्वतःला सावरून म्हणाले –

'जाऊ द्या. लहान पोर आहे ती, तिला काय समजतं ?'

मुक्ताईनं आपल्याला काय समजलं ते लगेच सांगून टाकलं –

'अखंड जयाला देवाचा शेजार ।
कारे अहंकार नाही गेला ? ॥
मान अपमान वाढविशी हेवा ।
दिवस असता दिवा हाती घेसी ॥
परब्रह्मासंगे नित्य तुझा खेळ ।
आंधळ्याचे डोहाळे कां बा झाले ? ॥
कल्पतरु तळवटी इच्छिली ते गोष्टी ।
अद्यापी नरोटी राहिली का ? ॥
घरी कामधेनू, ताक मागूं जाये ।
ऐसा द्वाड आहे जगामाजीं ॥'

'अगं मुक्ता, मुक्ता, काय बोलतेस हे ? असं लहान तोंडी मोठा घास घेऊ नये. ज्यानं देवाला आपल्या अंकित सदैव ठेवलं आहे, त्याला ज्ञानाची काय गरज ?'

ज्ञानदेव हे सारं मुकाट्यानं पाहात होते, ऐकत होते. मुक्ताबाई निवृत्तिनाथांना म्हणाली –

'ज्ञानाशिवाय भक्ती व्यर्थ आहे असं तुम्ही आणि ज्ञानोबादादा नेहमीच सांगता ना ? याला ज्ञान नाही म्हणूनच याच्या ठायी भोळ्या भक्तीचा एवढा अहंकार निर्माण झालाय् !'

'मुक्ता, खरं बोलावं हे ठीक. पण कित्येक वेळा अप्रिय ठरणारं सत्य टाळावं लागत प्रसंग पाहून. दुसऱ्याचं मन दुखावणं

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


बरं नाही. माणूस दुरावतो त्यामुळं आणि दुरावलेल्या माणसाचे दोष तसेच राहून जातात ! काय उपयोग त्या बोलण्याचा ? '

नामदेवांचे डोळे एव्हाना भरून आले होते. अंतरीच्या साऱ्या वेदना डोळ्यांतून बाहेर पडत होत्या. त्यांचे भरून आलेले डोळे पाहून तिखट स्वभावाची मुक्ताई अंतरी द्रवून गेली ज्ञानदेवांना ती म्हणाली –

'दादा, यांचा अहंकार मी घालवते.' नामदेवांकडं वळून म्हणाली, 'नामदेवकाका या एकादशीला तुम्ही आमच्या आळंदीला जरूर या हं. सिद्धेश्वराचं बोलावणं आहे तुम्हांला ! '

सिद्धेश्वराचं नाव काढल्यावर नामदेवांना होकार देणं भागच होतं. त्यांनी हो म्हटलं. निवृत्तिनाथ म्हणाले –

' महाराज, आपलं दर्शन होणे हे महद्भाग्य समजतो आमचं. या मुलीला जाण यायची आहे अजून. तिचं बोलणं मनावर घेऊ नका. माझी विनम्र विनंती आहे आपणाला. पण आळंदीला यायचं विसरू नका.'

सारी भावंडे नामदेवांचा निरोप घेऊन निघाली. नामदेव मनाला झालेला शीण विसरण्यासाठी वीणेच्या सुरात आपल्या अंतरीची आर्त व्यक्त करू लागले –

देह जावो अथवा राहो । पांडुरंगी दृढ भावो ।
चरण न सोडी सर्वथा । तुझी आण पंढरीनाथा ॥

## गोरोबाकाकांचे थापटणे

सिद्धेश्वराचं निमंत्रण मिळालं होतं आणि तेही थोर शिवभक्त निवृत्तिनाथांकडून. म्हणून नामदेवांना आळंदीस जाणं भागच

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


होतं. एकादशीचा दिवस नेमका आळंदीस साधेल अशा रीतीनं पांडुरंगाचं दर्शन घेऊन नामदेव आळंदीस निघाले. आळंदीस पोहोचल्यावर थेट सिद्धेश्वराच्या देवळात गेले. ज्ञानदेवादी भावंडं बसलेली त्यांना दिसली. परस्परांच्या गाठी–भेटी झाल्या. आता ही भावंडं कोणाचीतरी वाट पाहात होती. मुक्ताई म्हणाली -



'दादा, आजून गोरोबा काका कसे आले नाहीत ? '

'मुक्ता, तू अगदी मनावर घेतलेलं दिसतंय !'

'होय दादा ! त्यांना आत्मज्ञान व्हायलाच पाहिजे. नाही तर त्यांची अभूतपूर्व भक्ती वायाच जाईल की. थांब मीच बोलावून आणते त्यांना. '

मुक्ताबाई ही गोरक्षशिष्या, भर्तृहरीची भावजय. एलीचपूर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


राजाची कन्या योगिनी मुक्ताबाईचीच अवतार होती. चांगा वटेश्वर हे या योगिनी मुक्ताबाईचेच शिष्य. या चांगदेवानं आपली गुरु योगिनी मुक्ताबाई ही ज्ञानदेव-भगिनी मुक्ताबाईच्या रूपानं अवतरलेली आहे, असा अनुभव आसल्यामुळे याही मुक्ताबाईस त्यांनी गुरु केलं होतं. योगिनी मुक्ताबाईचाच ती अवतार असल्यामुळे तिच्या अंगी योगसामर्थ्य प्राप्त झालेलं होतं. या योगसामर्थ्याच्या बळावर ती तत्क्षणी गोरक्षनाथांना भेटायला निघाली.

शरीर पंचमहाभूतांनी बनलेलं असल्यामुळे जड असतं. जड तत्त्वं दूर केली आणि वायुतत्त्वाचाच आधार घेतला म्हणजे योगीपुरुष अथवा योगिनी कोठेही मुक्त संचार करू शकतात. मुक्ताबाईनं आपलं शरीर वायुरूप केलं आणि ' अलख निरंजन ' असा घोष करून आकाशमार्गे अनेक योजने दूर गेली.

' अलख निरंजन ' तिच्या कानी धीर गंभीर शब्द आले. साक्षात् गोरक्षनाथ होते ते. त्यांनी मुक्ताबाईला पाठीवरून हात फिरवून विचारलं --

' बऱ्याच वर्षांनी या अवतारात तू मला भेटायला आलीस हे जाणून मीच आलो अर्ध्या वाटेत तुला भेटायला. काय हेतू होता तुझ्या येण्याचा ? '

' गुरुदेव, भक्तीनं अहंकारी झालेल्या नामदेवांचे डोळे उघडायचे आहेत म्हणून तुमच्यासारख्या थोर अधिकारी गुरुदेवांना पाचारण करायला आले आहे मी. चला, येताना माझ्याबरोबर ! निवृत्ती-ज्ञानदेवादी वाट पाहात आहेत आपली ! '

' मुक्ता, यासाठी माझ्या येण्याची मुळीच गरज नाही. तिथं तुमच्या सान्निध्यात गोराकुंभार आहेत ना ? त्यांनाच सांग हे काम. ते अधिकारी पुरुष आहेत. त्याच्यात त्या वेळी मीच संचार

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



करीन. तो 'म्हातारा जुनाट पुरुष' त्या वेळी मीच असेन. तुझ्या हातून महत्कृत्य होणार आहे. जा. माझा आशीर्वाद आहे तुला. अलख निरंजन !'

असं म्हणून गोरखनाथ अंतर्धान पावले. मुक्तानेही 'अलख निरंजन' असा घोष करून त्याच आकाशमार्गानं परतली. आळंदीस सिद्धेश्वराच्या देवळात नामदेव, निवृत्ती, ज्ञानदेव, सोपानदेव, कान्होबा पाठक इत्यादी संत मंडळी मुक्ताची वाट पाहात बसले होते. मुक्ता आली. सर्वांना आनंद झाला मुक्ता नामदेवांकडे पाहात म्हणाली—

'दादा, गुरु गोरखनाथ म्हणाले की, तुमचं काम गोरोबा-काकाच करतील. तेच म्हातारा जुनाट पुरुष आहेत.'

बुचकळ्यात पडलेल्या नामदेवांनी विचारलं—

'कसलं काम आरंभलंय आत्ता ?'

'आपण सर्व परमार्थी आहोत. भक्ती, ज्ञान, वैराग्य, योग इत्यादी मार्गांनी एकेकानं खूप साधना केली आहे आजवर. आता थोर अनुभवी गोरोबाकाका आपली परीक्षा घेणार आहेत. हं, गोरोबाकाका, घ्या आपलं अनुभवाचं थापटणं, अन् पहा ही मडकी भाजून पक्की झाली आहेत की नाही ते !'

गोरोकाकांना ठरलेला संकेत समजला. त्यांनी आपल्या हातात थापटणं घेतलं. सर्वांत प्रथम निवृत्तिनाथांच्या डोक्यावर आपटलं. निवृत्तिनाथांनी हूं की चूं केलं नाही.

'वा, हे मडकं चांगलंच भाजून निघालं आहे हं !'

मग त्यांनी ज्ञानदेवांच्या डोक्यावर थापटणं मारलं. त्यांनीही हूं की चूं केलं नाही.

'हे तर मडकं चांगलंच पक्कं झालेलं दिसतंय भाजून !'

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



अशा रीतीनं त्यांनी सोपानदेव, मुक्ताबाई, कान्होबा पाठक यांच्या डोक्यावर आपल्या अनुभवाचं थापटणं मारून पाहिलं. कोणीच हूं की चू केलं नाही. ही सारीच मडकी भाजून अगदी पक्की झाली असल्याचा अभिप्राय दिला त्यांनी.

आता पाळी नामदेवाची. गोरोबाकाका नामदेवांकडं गेले. त्यांच्या डोक्यावर थापटणं मारलं. त्याबरोबर नामदेव 'अगाई गं ऽऽ' म्हणून विव्हळले. काका लगेच म्हणाले–

'अरेच्या, हे मडकं अजून कच्चंच दिसतंय!'

मुक्ताईसह सारी मंडळी खो खो हसली!!

नामदेव ओशाळले. मेल्याहून मेलं झालं त्यांना. हे सारं असह्य होऊ लागलं. आधीच पंढरीच्या वियोगानं मन दुखरं झालं होतं, त्यात ही विटंबनेची भर. त्यांना वाटू लागलं, 'यांच्या शब्दांत

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



सापडून इथं आलो हेच चुकलं. ही सारी माणसं स्वतःला संत म्हणवून घेतात, पण ही संत कसली? कैकाडी आहेत कैकाडी!'

'मला इथं क्षणभरही राहायची इच्छा नाही आता. मला जाऊ द्यात.' रागानं लाल झालेले नामदेव म्हणाले.

'असा राग मानू नका नामदेव महाराज. या जुनाट म्हाताऱ्यानं तुमच्यावर थापटणं चालवलं ते तुमच्या पारमार्थिक कल्याणासाठी.' ज्ञानदेवांनी समजावणी करण्याचा प्रयत्न केला.

'ज्ञानदेवा, बस् झालं. आता आणखी कोणती विटंबना करायची राहिली आहे? या सणकाडी मुक्ताईनं रचलं हे सारं कारस्थान. आता मला जित्रे जाऊ द्यात माघारी म्हणजे झालं!' नामदेव वैतागून म्हणाले.

'अरे नामदेवा, गोरोबाकाकांसारख्या अनुभवी, जुनाट पुरुषाकडून तुझा घट पक्का भाजण्यासाठी आम्ही तुला इथं बोलावलं. आणि तू रागानं निघून जातोस?' मुक्ताईनं समजावलं.

नामदेवांना वाटलं, 'खरंच हे आता आपल्याला भाजून काढणार की काय? थापटणं डोक्यावर मारलं. आता ही मंडळी आपल्याला भाजून काढायला कमी करणार नाहीत!' नामदेवांना 'घट भाजून काढणं' यातला पारमार्थिक अर्थ समजला नाही. ते घाबरून गेले. त्यांनी तिथून पळ काढला तो ते थेट पंढरपूरला येऊन थडकले. अपमानानं जीव व्याकुळला होता. पांडुरंगाच्या मंदिरात गेले आणि त्याच्या पायांना मिठी मारून रडू लागले. घडलेली सारी हकीगत विठ्ठलाला सांगितली आणि म्हटले —

'पांडुरंगा, पुन्हा मला तुझ्या या संतमंडळींच्या तावडीत सोडू नको रे! घात केला त्यांनी माझा!'

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



ज्ञानदेवें मज पाठविलें कोरें ।
जुनाट म्हातारा जाळीं आला ।।
मुक्ताईने माजविली कळी ।
ही संतमंडळी कपटी तुझी ।।

खरंच सांगतो, दैव बलवत्तर म्हणून जिवानिशी वाचलो आणि तुझ्या पायांशी येऊन पडलो. नाहीतर पुरा नाहीसाच झालो असतो ! आता तुझे हे पाय कधीच सोडणार नाही. फिरून कुठंही जाणार नाही.' असं म्हणून नामदेवांनी डोळ्यांना पाणी आणून माथा विठ्ठल-चरणांवर ठेवला. तेवढ्यात आपल्या पाठीवरून कुणीतरी हात फिरवत आहे असं त्यांना वाटलं. मागे वळून पाहाताहेत तो 'गोरोबाकाका.' त्यांना पाहताच नामदेव घाबरून गेले आणि म्हणाले—

'कोण ? गोरोबाकाका ? अजून माझी पाठ सोडत नाही की काय तुम्ही ? माझं काय करायचं ठरवलंय ?'

'नामदेवा, घाबरू नकोस. तुझ्यावर माया करणाऱ्या मुक्ताबाईनं तुझी काळजी घ्यायला पाठवलं आहे मला. तेरढोकीला जाताना तुला भेटायला सांगितलं तिनं म्हणून आलो. अरे 'घट भाजून काढायचा' या कल्पनेला एवढा भितोस तू ? माणसाला का कधी भाजतात ? अरे, घट भाजायचा म्हणजे हे शरीर, हे मन अनुतापानं पोळून निघालं आहे की नाही हे पाह्यचं. तुझं मन लौकिकात तसं पोळून निघावं म्हणून तर आम्ही तुझी फजिती केली. अनुतापानं पोळून निघालेलं मन परमार्थाचा अधिकार खऱ्या अर्थानं प्राप्त करून घेतं. नामदेवा, तुझी भक्ती मोठी आहे. तुला परमात्मस्वरूपाचं ज्ञान झालं नाही. अरे, ज्याची ओळख नाही,

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


ज्याचे गुण माहीत नाहीत त्याच्यावर प्रेम करता येईलच कसं ? ज्याच्यावर प्रेम करायचं त्याचं ज्ञान नको का व्हायला ? तुला परमात्मस्वरूपाचं ज्ञान झालं नाही म्हणून तू अहंकारी झालास. जा. ताबडतोब विसोबा खेचराकडे जा आणि त्यांना गुरु कर. गुरूशिवाय ज्ञान नाही. गुरूशिवाय परमार्थाची प्राप्ती नाही.' असं म्हणून गोरोबाकाका निघून गेले.

नामदेवांचा संशय अजून फिटला नव्हता. त्यांना अजून वाटत होतं, पंढरीचा पांडुरंग हाच देव, त्याचं-पूजन हीच भक्ती. त्यांनी मनाच्या विकल अवस्थेत पुन्हा पांडुरंगाच्या पायी माथा ठेवला व तसेच झोपी गेले. स्वप्नात पांडुरंग आले आणि त्यांनी नामदेवांना दृष्टांत दिला —

'नामदेवा, तू एवढा वाढलास, एवढा भक्त झालास, पण तुला ज्ञानाचा डोळा लाभला नाही. कारण तू कोणालाच गुरु केला नाहीस अजून. विसोबा खेचर अधिकारी पुरुष आहेत. त्यांना गुरु कर. '

## गुरूपदेश आणि निर्गुणानुभूती

आळंदीस घडलेल्या घटनेमुळे नामदेवात एक बदल घडून आला. आणि तो म्हणजे पंढरीचा पांडुरंग हाच देव. त्याचे भजन–पूजन हीच भक्ती. त्या सगुण मूर्तीचाच ध्यास हीच जीवनाची कृतार्थता, ही त्यांची श्रद्धा ढासळू लागली. ज्ञानदेवादी संतांनी अनुभवाचे प्रश्न करून त्यांना अंतर्मुख केले होते त्यामुळे त्यांना स्वतःच्या अज्ञानाची जाणीव होऊ लागली होती. ती होताच नामदेव गुरूच्या शोधास निघाले. औंढ्यानागनाथाच्या देवालयात

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



विसोबा खेचर असतात असे समजल्यावर अंतर्मुख नामदेव आता खऱ्या 'मुमुक्षू' च्या अवस्थेत त्यांना भेटायला औंढ्या-नागनाथाला आले. देवालयात येऊन गाभाऱ्याच्या द्वारापाशी येऊन उभे राहतात तोच त्यांना एक विचित्र दृश्य दिसलं. ज्यांच्याकडून गुरुपदेश घ्यायला आलो, ते विसोबा खुशाल देवाच्या पिंडीवर पाय ठेवून झोपलेले ! नामदेव म्हणाले —



'गुरुमहाराज, आपण पिंडीवर पाय ठेवुन खुशाल की हो झोपलात. तेवढे पाय उचला अगोदर. पाहवत नाही हे डोळ्यांनी! उठि उठि प्राण्या आंधळा की काय तूं ?'

विसोबा म्हणाले, 'कोण भक्त नामदेव ? वा, छान झालं. अरे नामदेवा, तूच तेवढे पाय उचलून बाजूला ठेव बरं. जेथे नसे देव तेथे पाय माझे ठेव !'

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



त्यांच्या या आदेशात गर्भितार्थ निराळाच होता. नामदेवांना हा आदेश सहज वाटला नाही. यात काहीतरी गूढ असलं पाहिजे अशी त्यांची खात्री झाली. त्यांची ही शंकितावस्था म्हणजे त्यांच्या भावजीवनाची संक्रमणावस्था होती. परंतु पिंडीवरील पाय त्यांना पाहवेनात. म्हणून ते त्यांनी उचलून दुसरीकडे ठेवले. पाहतो तो त्या जागी पिंडच ! सारं विश्व त्यांच्या भोवती गरगर फिरू लागलं. गाभाऱ्याच्या चार भिंती एकाएकी गडप झाल्या. सारं विश्वच शिवाचा गाभारा झालं आहे, असा विराट अनुभव येऊ लागला.

नामा पाहे अवघा जिकडे तिकडे देव ।
कोठे रिता ठाव न देखेचि ।।

सारं विश्वच शिवमय झाल्याचा प्रत्यय नामदेवांना आला. त्यांच्या आंधळ्या भक्तीला डोळे फुटले. सारे चराचर विश्वरूप परमात्म्यानं कोंदाटून गेल्याचं दिसू लागलं. द्वैत टळलं. जन्ममरणाचं साकडं नाहीसं झालं. ज्ञानदेवांच्या, गोरोबाकाकांच्या आणि श्रीविठ्ठलाच्या आदेशाचं हे फलित होतं. औंढ्याच्या विसोबा खेचरांनी ‘श्रवणीं सांगितली मात, मस्तकीं ठेविला हात.’ ज्ञानदेवांच्या आणि मुक्ताईच्या प्रेरणेनं नामदेवांना गुरु लाभला आणि त्यांच्या आत्मदृष्टीला जाग येऊन कैवल्य त्यांच्या पुढं येऊन उभं ठाकलं. नामदेव आता केवळ भक्त राहिले नव्हते, तर ते ज्ञानी भक्त झाले होते. गुरूविषयीची कृतज्ञता व्यक्त करताना नामदेव म्हणतात —

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


'सद्गुरू नायकें पूर्ण कृपा केली ।
निज वस्तू दाविली माझी मज ॥
माझें सुख मज दावियेलें डोळां ।
दिधली प्रेमकळा ज्ञानमुद्रा ॥
तया उतराई व्हावे कवण्या गुणें ।
जन्म नाहीं येणें ऐसें केलें ॥
नामा म्हणें निकी दाविंयेली सोय ।
न विसरावे पाय विठोबाचे ॥'

## सद्गुरु विसोबा खेचर

ज्ञानदेवांच्या प्रभावामुळे श्रेष्ठ पारमार्थिक अधिकार प्राप्त झालेले विसोबा खेचर हे रूढ समजुतीप्रमाणे सोपानदेवांचे शिष्य म्हणून सांगितले जातात. खुद्द विसोबाच एका अभंगात म्हणतात —

'माझी मूळ पीठिका सोपान सद्गुरु ।
तेणें माथा करुं ठवीयेला ॥
त्याचे कृपेकरून मीपणा ठकलो ।
देहभावा गेलों विसरूनयां ॥
चांगियाचा अंगिकार मुक्ताईनें केला ।
सोपान वोळला मजवरी ॥
जन्ममरणाचे भय नाहीं आतां ।
खेचरी तत्वता मुद्रा दिली ॥
जिकडे पाहे तिकडे आनंद भरला ॥
खेचर सामावला तयामाजी ॥'

त्यांच्या या उक्तीनुसार त्यांची गुरुपरंपरा आदिनाथ; मत्स्येंद्र-

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



नाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव विसोबा खेचर अशी ठरते. परंतु विसोबा खेचरांचा 'षट्स्थल' नावाचा ग्रंथ अलीकडेच उपलब्ध झालेला आहे. त्यात ते स्वतःस 'कृष्णसुत', 'कृष्णकुमार' असे संबोधतात, आणि 'कृष्णनाथ' असे आपल्या गुरूचे नाव सांगतात. या ग्रंथाच्या शेवटी त्यांनी आपली समस्त गुरुपरंपरा पुढील शब्दांत सांगितली आहे –

तो आदिनाथ ईश्वरू । मिननाथ तो मच्छिंद्रु ।
तयाचा हांये कुमरू । गोरक्षनाथु ॥
गोरक्षाचीं दुहिता मुक्ताई । चांगया वटेश्वरु पाटी ।
उन्मेषु रामकृष्ण तोही । वैसु चांगयाचा ॥
तोचि हा संप्रधारू आदिनाथांचा ।
श्री गोरक्षनाथें प्रगट केला साचा ॥
तोचि विचारू कथिला योगाचा । कृष्णसुतें ॥

यावरून विसोबा खेचरांची गुरुपरंपरा आदिनाथ, मत्स्येन्द्रनाथ गोरक्षनाथ, मुक्ताबाई, चांगावटेश्वर, कृष्णनाथ, विसोबा खेचर अशी ठरते; आणि वैष्णव-परंपरेत विठ्ठलाची उपासना करणारे नामदेव अशा रीतीनं गुरुपरंपरेनं शैव-नाथशैव ठरतात.

अर्थात् गुरुपरंपरेनं शैव असलेल्या नामदेवांना वैष्णव-परंपरेत राहून परमार्थ साधना करण्यात कोणतीच अडचण नव्हती. कारण विठ्ठल हे त्याचं वैष्णव-परंपरेतील उपास्य दैवत हरिहरैक्याचं एक प्रतीक होतं.

## औंढ्यानागनाथ

औंढ्यानागनाथ हे एक पुरातन पाशुपत क्षेत्र आहे. बारा ज्योतिर्लिंगात मोडणारं हे ज्योतिर्लिंग समस्त भारतातील शिरो-

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



पासकांचं तीर्थस्थान म्हणून माहत्म्य पावलेलं आहे. या मंदिराच्या गर्भगृहाला मागचं दार आहे. त्याचं अनन्यसाधारण वैशिष्ट्य मानलं जातं. नरसीबामणी या नामदेवांच्या मूळ गावा-हून अगदी थोड्या अंतरावर असलेल्या या क्षेत्री नामदेव बालपणा-पासून दर्शनासाठी जात असत. त्यांच्या शिवभक्तीचा हा धागा त्यांनी शेवटपर्यंत आपल्या उराशी जपून ठेवला होता. या शिव-मंदिराच्या गर्भगृहाला असलेल्या मागच्या दारावरून नामदेवांच्या चरित्र्याशी निगडित अशी एक चमत्कारपूर्ण दंतकथा सांगितली जाते.

पंढरपूरहून नामदेव मुद्दाम औंढ्यानागनाथाच्या दर्शनासाठी आले होते. एव्हाना लोकमानसात त्यांच्याविषयी कमालीचा पूज्य भाव निर्माण झाला होता. नामदेवांनी नागनाथाचं दर्शन घेतलं आणि कीर्तनाला उभे राहिले. लोकसमुदाय दाटला होता. कीर्तन ऐन रंगात आलं असताना काही ब्राह्मण अभिषेकासाठी आले असता त्यांना लोकांची शिवाशीव होऊ लागली. त्यामुळे कर्मठ ब्राह्मण चिडून गेले. तशात नामदेवासारख्या शिंप्याने आपल्या नामसंकीर्तनानं एवढ्या मोठ्या संख्येनं आलेल्या लोकसमुदायास खिळून ठेवावं, या गोष्टीमुळे त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली त्यांनी कीर्तन ऐन रंगात आले असतानाही नामदेवांना देवा-लयातून हुसकावून लावले. शेवटी लोकांचा विरस झालेला पाहून नामदेवांनीं देवालयाच्या मागे जाऊन कीर्तन चालू ठेवले. परंतु त्यांचं मन कीर्तनात रमेना. कारण देवमूर्ती समोर नव्हती. शेवटी नामदेवांनी हरिनामाचा धावा सुरू केला, आणि चमत्कार असा झाला की, संपूर्ण मंदिर फिरलं आणि गर्भगृहाचं प्रवेशद्वार कीर्तन

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



करणाऱ्या नामदेवांसमोर पुन्हा आलं! नामदेवांना आणि भाविक श्रोतृवृंदाला ब्रह्मानंद झाला.

नागनाथाच्या या मंदिरास जे मागचे दार दिसते, ते पूर्वी गर्भगृहाचे प्रवेशद्वार होते, असे आजही लोक सांगतात.

पूर्वी पाशुपतांत विपरीत नमस्कार-पद्धती रूढ होती. देवाला समोरून नमस्कार न करता देवाच्या मागे जाऊन भरटक पूजाऱ्याव्यतिरिक्त इतरांनी नमस्कार करायचा, अशी विपरीत नमस्काराची पद्धती होती. या पद्धतीला अनुसरून या मंदिराच्या गर्भगृहाला पाठीमागचं दार ठेवलं गेलं. परंतु भक्त नामदेवांना जेव्हा ब्राह्मणांनी हुसकावून लावलं; आणि नामदेव मंदिरातल्या मागच्या बाजूस कीर्तन करू लागले, तेव्हा सर्व जनताजनार्दन मागे वळला. या वस्तुस्थितीला हा अद्‌भुताचा गडद रंग मिळाला. अशा अद्‌भुतात काहीतरी सत्याचा अंश असतो हे मात्र खरे.

गुरुबोधाच्या प्राप्तीनंतर नामदेवांना नाथसंप्रदायातील विचारांचे पाथेय प्राप्त झाले. मूलतः ते शिवोपासक होतेच, परंतु त्यांच्या शिवोपासनेला नाथसंप्रदायातील परंपरेचे अधिष्ठान प्राप्त झाले. असे असूनही त्यांच्या भावसृष्टीत हरिहरैक्याचं प्रतीक असलेला विठ्ठलवीरु कोंदटून राहिला होता. म्हणजे नामदेवांची स्थितीगती ज्ञानदेवांप्रमाणेच झाली. म्हणजे गुरुपरंपरेने शैव असलेले हे परमार्थकसाधक वैष्णव-परंपरेचेच पायिक बनले.

आता नामदेवांची भक्तिसाधना डोळस झालेली होती. तिच्यातील उपास्य दैवताविषयीची एकदेशीयत्वाची भावना झडझडून नाहीशी झालेली होती, आणि आता नामदेव ज्ञानाधिष्ठित शुद्ध परमार्थ निरूपू लागले होते —

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



पाषाणाचा देव बोलेचि ना कधी ।
हरी भवव्याधी कैंवी घडे ।।
दगडाची मूर्ति मानिला ईश्वर ।
परि तो साचार देव भिन्न ।।
दगडाचा देव इच्छी पुरवित ।
तरी का भंगत आघाताने ।।
पाषाण देवाची करिती भक्ती ।
सर्वस्वा मुकती मूढपणे ।।

याचा अर्थ हाच की, निर्गुणाच्या अपेक्षेने केलेली सगुणाची भक्ती फलदूप होते, परंतु केवळ सगुणालाच कवटाळून बसल्याने आत्मवंचनाच पदरी पडण्याची शक्यता असते. नामदेव आता सगुणाचोनि आधारे निर्गुणाची प्राप्ती करून घेण्यासाठी उत्कंठित झाले होते. ' देवावीण ठाव रिता नाही ' या सत्याचे त्यांना ज्ञान झाले होते, परंतु त्याची अनुभूती घ्यायलाते पर्युत्सुक झाले होते. विठाई माउली ही कृपेची कोवळी आहे ही श्रद्धा अंतरी दृढ होती.

## नामदेवांच्या जीवनात घडलेली क्रांती

विसोबाच्या अनुग्रहामुळे नामदेवांच्या जीवनात क्रांती घडून आली. आजवर ते केवळ भक्त होते पण आता त्यांच्या भक्तीला ज्ञानाचा डोळा प्राप्त झाला होता. विसोबांनी त्यांचे डोळीयांचे डोळे उघडले होते. जन्ममरणाचे साकडे सोडवून आनंदाचे लेणे लेवविले होते. विटेवरचा पांडुरंग हा चैतन्याचा गाभा आहे याचे ज्ञान प्राप्त करून दिले होते.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



सर्वकाळीं परमात्मा आहे सर्व देशी ।
भावना हे अहर्निशी दृढ धरी ।।
संत समुदाव मिळती जेथें जेथें । जाय तेथें तेथें लोटांगणी ।
चिंता न करी नाम्या येणें तरसी जाण ।
तुज सांगितली खूण निर्वाणीची ।।

परमात्मा सर्व स्थल–कालाला व्यापून राहिलेला आहे. त्याला मूर्तिरूपामुळं स्थलकालांनी मर्यादित करता येत नाही. संतांच्या पुढे नम्र हो, म्हणजे तू तरून जाशील, अशी खूण त्यांनी नामदेवांना सांगितली होती.

औंढ्यानागनाथ आणि येथील विसोबा खेचर नामदेवांना परिचित म्हणून त्यांजकडून ही योगदीक्षा व ही निर्गुणानुभूती घेण्यास ज्ञानदेवांनी सुचविले असावे. या अनुभूतीनंतर ' जाति-व्यक्ति पडे बिंदुलें ' अशी साधकाची अवस्था निर्माण होते. कारण अखिल विश्वाला आणि भूतमात्राला व्यापून राहणारे हें अवि-नाशी, अनादी, अनंत, निर्गुण, निराकार तत्त्व स्थलकाल आणि जातिव्यक्ती यांच्या अतीत आहे. त्यामुळे त्याची उपासना करणाऱ्या साधकाच्या ठिकाणी हे सारे विकार, अहंकार पूर्णपणे मावळतात आणि तो विश्वव्यापक मानवतेच्या भूमिकेवर आरूढ होऊन कारुण्यामाजी पाऊले लपवून चालतो. अशी स्थिति नाम-देवांना विसोबाच्या उपदेशामुळे प्राप्त झाली आणि त्यांच्या मान-जीवनात क्रांतिकारक बदल घडून आला. सगुण विठ्ठलाच्या स्वरूपात विश्वव्यापक, निर्गुण, निराकार परमात्मस्वरूप पाहू लागले.

विसोबा खेचरांनी –

' श्रवणी सांगितली मात मस्तकीं ठेविला हात ।

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



पदपिंडाविवर्जित केला नामा ॥
सांगितले गुज दाखविलें निज । '

म्हणजे नेमके काय केले हे पाहणे मनोरंजक आणि उद्बोधक ठरण्यासारखे आहे. विसोबांनी 'श्रवणी सांगितली मात' ही दुसरी तिसरी कोणतीही गोष्ट नसून 'साम्यावस्था' हीच गोष्ट आहे. योग्य अधिकारी पुरुषाला 'तत्त्वमसि' (तो (परमात्मा) तूच आहेस) या महावाक्याचा उपदेश होताच शिष्याच्या अंतःकरणात परिवर्तन होते. म्हणजेच अज्ञान नाहीसे होते. मी देह आहे ही बुद्धी नष्ट होऊन मी देव आहे असा निश्चय होतो. ज्याच्या ठिकाणी मी देव आहे असा निश्चय झालेला असतो, त्याला सर्वत्र देवाचीच प्रचिती होते. ही जी साम्यावस्था, त्यालाच भागवत धर्म असे म्हणतात. नामदेव आता खऱ्या अर्थानं या धर्माचे पायिक बनले. विसोबांच्या अनुग्रहामुळे त्यांच्या जीवनात क्रांती घडून आली. आजवर भोळे भक्त म्हणून ओळखले जाणारे नामदेव या यौगिक संचारामुळे किंवा ज्ञानप्राप्तीमुळे सर्वत्र सम असणाऱ्या निर्गुण, निराकार, चिन्मय परमात्मतत्त्वाची उपासना श्रीविठ्ठलाच्या रूपानं करू लागले. नामदेवांच्या आत्मिक उपासनेला इथून पुढे सुरुवात होते. नैवेद्य खाणारा विठ्ठल, दगडाचे सोने करणारा देव, दृष्टांत देणारा देव या साऱ्या लौकिकापलीकडच्या अनादी, अनंत, निर्गुण, निराकार तत्त्वाची ओढ आता त्यांच्या अंतरात्म्याला लागून राहिली, आणि या अंतरात्म्याच्या ओढीतून त्यांच्या आत्मिक उपासनेला सुरुवात झाली.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



# पारमार्थिक तळमळ

सगुणोपासनेचा आजवर अनुभवलेला भोळा आनंद आणि आता निर्गुणाच्या भेटीची लागून राहिलेली तळमळ यांच्या दरम्यान नामदेवांच्या मनाची अवस्था मोठी विचित्र झाली असणार. परंतु आता मनाचा निश्चय झालेला होता. त्या अनंत तत्त्वाची अनुभूती विठ्ठलाला निमित्त करून घेतल्याशिवाय थांबणे नाही असा दृढसंकल्प केला आणि नामदेव अंतरात्म्याला साक्षी ठेवून उपासनेला लागले. अखंड भक्ती आणि अखंड नामस्मरण हाच निदिध्यास पुन्हा सुरू झाला. ते देवाला आळवू लागले.

'देवा, प्रपंचाच कष्ट उपसून शिणलेला हा नामा आता तुझ्या दाराशी आला आहे. तुझ्या कृपेची सावली मिळेल तरच तो निवेल. मी रंकाहूनही रंक असलो तरी संताचा सेवक आहे, विठोबाचा नामधारक आहे, तेव्हा तू मला पैलपार नेशील या भरंवशावर मी तुझे चरण धरीत आहे. माझे मनोरथ तुझ्यावाचून कोण पुरवणार ?'

'संत म्हणतात की, विठाई माऊली ही कृपेची कोवळी' आहे, तिचा आठव करताच ती भक्तांना प्रेमपान्हा पाजते. असे जर असते, तर माझे हृदय इतके विव्हळत असताना तिला माझी करुणा का येत नाही ? या भक्तीच्या वाटेवरून चालताना माझे पाय रक्तबंबाळ झाले आहेत, शरीर थकून गेले आहे, हृदय निराशेनं काळवंडलं आहे, वाट पाहून प्राण नेत्रांशी आले आहेत. तरीही ही माउली मला का भेटत नाही ?'

'हे सर्वात्मक विठ्ठला,

'तूं माझी माऊली मी वो तुझा तान्हा ।

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



पाजी प्रेमपान्हा पांडुरंगे ।।
तू माझी माऊली मी तुझें वासरुं ।
नको पान्हा चोरूं पांडुरंगे ।।
तूं माझी हरीणी मी तुझें पाडस ।
तोडी भवपाश पांडुरंगें ।।
तूं माझी पक्षीणी मी तुझें अंडज ।
चारा घाली मज पांडुरंगें ।।
नामा म्हणे होसी भक्तींचा वल्लभा ।
मागेंपुढें उभा सांभाळिसी ।।'
'विसावा विठ्ठल सुखाची साऊली ।
प्रेमपान्हा घाली भक्तांवरी ।।
दाखवी चरण दाखवी चरण ।
दाखवी चरण नारायणा ।।
विठ्ठल आचार विठ्ठल विचार ।
दावी निरंतर पाय आतां ।।
नामा म्हणे नित्य बुडालो संसारीं ।
धावोनिया धरी हातीं मज ।।'
'भेटी लागी जीवा लागलीसे आस ।
पाहे रात्रं दिवस वाट तुझी ।।
पौर्णिमेचा चंद्रमा चकोरा जीवन ।
तैसें माझें मन वाट पाहे ।।
दिवाळीच्या मूळा मोठी आस केली ।
पाहता वाटुली मायबापा ।।
नामा म्हणे आम्हीं लेकराची जाती ।
भेटावया खंती वाटतसे ।।'

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



'देवा, तुझे मी पोसणे असूनही विरहाच्या वणव्यात जळत आहे, वासनेच्या डोहात बुडत आहे. तू येशील आणि माझ्यावर प्रेमाची पाखर घालशील या आशेने कसेबसे प्राण धरून मी दिवस मोजीत आहे. नेत्री आसुवें दाटून, बाहू पसरून रात्रंदिवस वाट पाहणारा हा तुझा नामा तुला दिसत नाहीं काय ? माझा हा 'गांजिल्याचा धावा' तुला ऐकू कसा येत नाही ? 'शिणले डोळुले पाहता वाटुली । अवस्था दाटली हृदयामाजी ।।' ही माझी स्थिती तुला समजत नाही का ? मग उशीर का ?

'वाडवेळ कां लाविला । कोण्या भक्ताने गोविला ।
झडकरी ये गा विठ्ठला । कंठ आळवितां शोषला ।।
वाट पाहे दाहीं दिशा । जीवीं धरोनि भरंवसा ।
प्राण केव्हां येईल माझा । आलिंगील बहू भुजा ।।
नाम गहिवरे दाटला । देह धरणिये लोटला ।।

नामदेवांचे डोळे करुणार्द्र भावानं ओसंडून वाहात होते. त्या अरूपाचं रूप त्यात नितळपणे दिसावं म्हणून की काय हे डोळे पाण्यानं स्वच्छ करीत होते ते, परमात्मभेटीसाठी जेवढे म्हणून सायास करता येतील तेवढे त्यानी केले, पण तो आनंदाचा आनंद भेटेना. त्यांच्या मनाच्या चकोराला दयाघन मेघातील एक थेंबाची आस लागून राहिलेली होती. त्याला या भूमीवर पाणीचं नको होतं. त्यांच्या मनाचा मोर त्या शामल मेघाच्या भेटीशिवाय नाचू शकत नव्हता आणि म्हणून नामदेव प्राण डोळ्यात आणून त्याची वाट पाहताना म्हणत होते –

'तळीयाचें पाळी वृक्षावरी बैसोनी ।
कैसा चातक बोभाइतो रे ! ।।
तहाने फुटे, परा उदक नेघे ।

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



मेघाचि वाट पाहे रे !
तैसा येई बा कान्हया, येई बा कान्हा ।
जीवीच्या जीवना, केशीराजा रे ! ।।
टाळघोळ मृदंग नानापरींचीं वाद्यें ।
वाजतीं वोजा रे ।
रानीच्या मयूरा नृत्या पैं न ये ।
तुजवीण मेघराजा रे ! ।।'

## आत्मनिरीक्षण आणि आत्मपरीक्षण

परमार्थात आत्मनिरीक्षणास आणि आत्मपरीक्षणास अत्यंत महत्त्व असतं. आत्मपरीक्षण करून आपले दोष, आपल्या उणीवा आपल्यालाच समजल्या म्हणजे अंतःशुद्धी होते आणि अंतःशुद्धी झालेला साधकच परमार्थाचा खरा अधिकारी होतो. साधकाचं अंतःकरण हाच परमात्म्याचा अंश असलेला मनुष्य-देहातल्या आत्मतत्त्वाचा गाभारा असतो. तो अनेक वासनांच्या, विकारांच्या, दोषांच्या, दुर्गुणांच्या जाळ्या-जळमटांनी गच्च भरलेला असेल, तर त्यात परमात्मप्रीतीचा प्रकाश पडणारच कसा ? म्हणून हा अंतःकरणरूपी गाभारा प्रथम अंतर्मुख होऊन आत्मनिरीक्षणानं, आत्मपरीक्षणानं स्वच्छ करायचा असतो. नामदेवांना असं वाटू लागलं की, इतकी भक्ती करून, इतका टाहो फोडून मी देवाला हाकारीत आहे, पण देव ओ द्यायला तयार नाही. त्या अर्थी आपल्यातच काही दोष असले पाहिजेत. म्हणून ते अंतर्मुख झाले आणि आत्मनिरीक्षण व आत्मपरीक्षण करू लागले. ते देवाला म्हणू लागले—

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


'अमृताहुनी गोड नाम तुझें देवा
मन माझें केशवा कां बा न घे ? ।।
सांग पंढरी राया काय करूं यासीं
कां रूप ध्यानासी न ये तूझें ? ।।
कीर्तनीं बैसतां निद्रें नागवीलें
मन माझें गुंतलें विषयसूखा ।।
हरिदास गर्जती हरिनामाच्या कीर्ती ।
नये माझ्या चित्तीं नामा म्हणें ।। '

'देवा, अंतःकरणात भाव नसताना मी भक्ती तरी कशी करणार ? माझ्या गुणदोषांविषयी म्हणशील तर मी तो आहे राशी अपराधांची ! अंगुष्ठापासून मस्तकापर्यंत मी अखंड दुश्चित्त आचरीत आलो आहे. आयुष्य संपले तरी माझ्या वासना संपणार नाहीत, इतक्या त्या बलवत्तर आहेत. नामाचे दोषच आम्हास नाडीत आहेत हेच खरे. अशा, मनीषा, तृष्णा यांसारखे पाठीमागे लागलेले भोग देवाच्या भेटीचा योग येऊ देत नाहीत. विषयात आसक्त झालेल्या मनाला कधी ध्यान करता आले आहे का? देवा, वरवर मी भक्तिप्रेमभावाची उधळण करीत असलो तरी माझ्या अंतरीचा प्रपंच सुटलेला नाही. मी लटिका, माझा भाव लटिका, भक्ती लटिकी, ज्ञान–ध्यान, भजन–पूजन सारे काही लटिकेच आहे.

'दयाघना, माझी स्थिती त्या नापिकासारखी झाली आहे. वासना वरवर खोडिल्या असल्या तरी अंतरी त्यांची वाढ सतत होत आहे. जग मला विष्णुदास म्हणते, पण माझ्या अंगी प्रेमभाव नसल्यामुळे ते ऐकताना माझी मलाच लाज वाटते.

देवा, आजवर मी बहुतांचा सेवक झालो, येता जाता थोर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


कष्ट केले त्यांच्यासाठी. पण माझे माझे म्हणून मी ज्यांना ज्यांना मिठी घातली ते ते सर्व माझ्यापासून पाहता पाहता दूर झाले. त्यामुळे लाभ तर दूरच राहिला, पण स्वरूपानंदालाही मी पारखा झालो. देवा संसारावर रुसलेला हा नामदेव तुझ्या महाद्वाराशी स्फुंदत स्फुंदत आला आहे. त्याची तुला कीव आली नाही तर तो सर्वथा वाया जाणार. मी अगतिक आहे, दुबळा आहे, हा देह तुझ्या पायी समर्पित करावा असे फार वाटते; पण मायामोह घात करतात. अशा नदीच्या पुरात मी दूरवर वाहात आलो आहे. त्यात माझ्या पदरची भक्तीची नवरत्ने बुडाली, विवेकाची सोबत सुटली, सर्वस्व गेले, थोर हानी झाली. या माया नदीत मी बुडणार तेव्हा तू पीतांबरासहित उडी घालून मला वाचव.'

अशा प्रकारे नामदेवांनी आत्मपरीक्षण करून आपल्या अंतःकरणाची शुद्धी करून घेतली, आपले सर्वस्व परमेश्वराला मनोभावे अर्पण केले.

## देवाशी संघर्ष

अंतरीच्या साऱ्या वेदना उघड करूनही देव प्रसन्न होत नाही हे पाहून नामदेव काहीसे उद्विग्न झाले आणि देवाशी आता संघर्षाची भाषा बोलू लागले. निर्वाणीचे हत्यार उपसले आणि देवाला बोलू लागले,

'देवा, हा निलाजरा नामा कंठी प्राण धरून रात्रंदिवस तुझी वाट पहात आहे, पण अजूनही तुला माझा करुणा येत नाही. तू

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


कोमल हृदयाचा आहेस असे म्हणतात, पण मला तर अगदी वेगळाच प्रत्यय येत आहे. मुंगीच्या गळ्यात मेरु पर्वत अडकवावा त्याप्रमाणे मला या संसारात अडकवून तू दुरून कौतुक पाहतोस, ही तुझी मायेची तऱ्हा आता मी चांगली ओळखतो. आता यापुढे तुझ्यावर न विसंबता माझा मीच काय तो उपाय करीन. समजा, मी लटिका असलो तरी तुझ्या खरेपणात पालट होण्याचे काहीच कारण नाही. तुझे ब्रीद पतितांचा उद्धार करणे, हे ध्यानात घेऊन मी तुझ्याकडे आलो. तुला आपले नाव राखलेच पाहिजे. आणि असे पहा की, तुला मोठेपण पतितांमुळेच प्राप्त होते. तेव्हा माझ्या-सारख्या पतिताच्या रूपाने तुझे दैव तुझ्या दाराशी आले आहे, तेव्हा मला दारातून दूर लोटू नकोस.'

'दयाघना, तू उदारांचा राणा म्हणवितोस, पण तुझे हे मोठेपण खोटे आहे. न घेता न देसी असा तू स्वार्थी आहेस.तुझ्या या कपट-नाटकाचा मी सर्वत्र बोभाटा करीन आणि 'लबाड तू देवा. लबाड तू देवा' असे सर्वत्र गर्जून सांगेन. आजवर तू अनेकांना चाळविलेस, आणि आता मलाही चाळवीत आहेस. पण मी अज्ञाने फसणार नाही. तुझ्या आदिअंतीच्या खुणा मी जाणून आहे. तुझी वर्मे उघड केल्यावाचून मी राहाणार नाही. खरोखर, तुझा संग आता पुरे. मी इतके बोलतो आहे, पण पहा कसा घरघेण्यासारखा कटी कर ठेवून स्वस्थ उभा आहे ! देवा, आता मला अधिक डिवचू नकोस. कारण, एकदा का मी पिसाळलो तर तुझ्या पायीच झोंबेन.'

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



देवा, तू कितीही दूर राहिलास त्याचा तरी काही उपयोग नाही. कारण –

लपलासि तरी नाम कैसें नेसी । आम्हीं अहर्निशीं नाम गाऊं ।
आम्हां पासुनिया जातां न ये तुज । तें हें वर्मबीज नाम घोकूं ।।
आम्हांसि तो तुझें नामचि पाहिजे । मग भेटी सहजें देणें लागे ।
भोळीं भक्तें आम्हीं चुकलो होतों वर्म ।
सांपडलें नाम नामयासी ।।

अशा अनेक रीतींनी नामदेवांनी परमेश्वराला अडचणींत आणण्याचा, त्याला कोंड्यात टाकण्याचा प्रयत्न करून पाहिला. शेवटी हताश होऊन, वैतागून नामदेव म्हणू लागले –

'पतीतपावन नाम ऐकुनी आलों मी द्वारा ।
पतीतपावन नव्हेसि म्हणुनी जातों माघारां ।।
घ्यावें तेव्हां द्यावें ऐसा असशी उदार ।
काय धरुनि देवा तुझें कृपणाचें द्वार ।।
सोडीं ब्रीद देवा आतां नव्हेसि अभिमानी ।
पातित पावन नाम तुझें ठेवियलें कोणी ।।
झेंगट घेऊनि हातीं दवंडी पिटीत तिहीं लोकीं ।
पतितपावन देवा परी तूं मोठा घातकी ।।
नाम म्हणें देवा तुझें न लगे मज कांहीं ।
प्रेम असो दे चित्ती म्हणुनी लागतसे पायीं ।।

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



नामदेवांची ही विरोधी भक्ती होती. 'रोषे प्रेम दुणावटे' असे ज्ञानदेव म्हणतात ते या अर्थाने. नामदेवांचा देवाशी हा प्रेमकलह होता. वरवर ते देवाशी भांडत होते, त्याला बोल लावत होते, पण अंतरी प्रेमाचे उमाळे येत होते. शेवटीं भांड भांडून नामदेवांनी परमेश्वराचे पायच अनन्यभावानं धरले, आणि निर्धार केला –

'देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो ।।
चरण न सोडी सर्वथा । तुझी आण पंढरीनाथा ।।
वदनी तुझें मंगल नाम । हृदयीं अखंडित प्रेम ।।
नामा म्हणें केशवराजा । केला नेम चालवि माझा ।। '

---

## परमात्मभेटीची पहाट

---

अखेर नामदेवांचं भाग्य उजळलं आणि त्यांच्या पारमार्थिक जीवनात परमात्मभेटीची पहाट फुटली. सर्व भावजीवन उजळून गेलं. आत, बाहेर, सर्वत्र प्रकाशच प्रकाश दिसू लागला. हा प्रकाशाचा सोहळा पाहता पाहता देहभान हरपून गेलं. अनुभवाला येत होतं फक्त आत्मतत्त्व. अंतरात्मा परमात्म्यात मिळून गेल्याचा अलौकिक अनुभव अनुभवाला येत होता. मन उन्मन झालं होतं.

मन झालें उन्मन वासना तल्लीन । देखिले हरिचरण सर्व ठायीं ।।
गुरुशिष्य मत हरपला दृष्टांत । प्रत्यक्ष त्वरित हरी झाला ।।
नामा म्हणें पाही रूप चहू बाहीं । दिशादुमित दाही हरि दिसे ।।

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



या विश्वात्मक स्वरूपाला त्यांनी आपल्या विश्वात्मक झालेल्या हृदयसंपुटात सामावून घेतलं. हा वाटसरू जी वाट पाहात होता ती वाटच होऊन बसला. त्यांच्या भावविश्वात जिकडे तिकडे विठोबाच अवघा भरून राहिलेला दिसू लागला. अवनी अंबर अंतर तुटलं आणि आकाशातील विराट तेजानं दाही दिशा कोंदटून गेलेल्या दिसू लागल्या.

कोटिसूर्य प्रभादीप्ती । गगनी झळकली अवचिती ॥
संत नामया सांगती । पैल आला कमलापती ॥
वत्सालागी जैसी धेनु । तैसा धावे जगज्जीवनु ॥
गरुडाचे पक्षवाती । दाही दिशा आक्रंदती ॥
हरिकंठीची सुमनमाळा । सुटूनि आली भूमंडळा ॥
उचलोनि दोही बाही । नामा धरिला हृदयीं ॥

जीवनातील सारी भ्रांती नाहीशी झाली, तहानभूक हरपली, अंतरीची वासना निमाली, पाप, ताप आणि दुःख नाहीसे झाले आणि अवघ्या सुखाचा सोहळा अनुभवाला येऊ लागला. तो बोलवेना. अंतरीच्या कारुण्यानं वैश्विक कारुण्याशी नातं जोडलं होतं. अंतरीचा प्रेमभाव वैश्विक प्रेमभावात सामावून गेला होता. हे वैश्विक प्रेम त्यांना विटेवर भेटलं होतं. योगीयांच्या चित्ताचा लय ज्या ठिकाणी होतो असं नामरूपातीत तत्त्व अनुभवाला आल्यामुळे त्रिपुटी ओलांडून सर्वांच्या पलीकडचा केशव त्यांना भेटला होता. नामाच आता केशव झाला होता. आपलंच रूप या विश्वात कोंदटून गेल्याचा विराट अनुभव त्यांना येऊ लागला. सर्वत्र आत्म-

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



तत्त्वच भरून राहिल्याची दिव्य अनुभूती आल्यामुळे माझा मीच देव अशी आगळी स्थिति ते अनुभवीत होते.

मीच माझा देव मीच माझा भक्त
मी माझा कृतार्थ सहज असे ॥
बंध आणि मोक्ष मायेची कल्पना
पडली होती मना कैसी भ्रांती ॥
विठ्ठलें विचारें दाखविलें सुख
होतें जें असंख्य हारपलें ॥
नामा म्हणें सोय सापडली निकी
झालो एकाएकी हरीचा दास ॥

ह्या विराट अनुभूतीमुळे त्यांचं जीवन अंतर्बाह्य बदलून गेलं. मी–तूची भाषाच उरली नाही. सारं द्वैत टळलं होतं. त्यामुळे अंतरीच्या साऱ्या कळा निमाल्या होत्या. त्यांना आपलं श्रेय लाभलं होतं. आपलं आणि आपल्या प्रेयसाचं नातं काय याचं कोडं त्यांना उलगडलं होतं. या अद्वैताची गूढ अनुभूती व्यक्त करताना ते म्हणतात –

'तूं आकाश मी भूमिका । तू लिंग मी साळुंका ।
तूं समुद्र मी द्वारका । स्वयें दोन्ही ॥
तूं वृंदावन मी चिरी । तूं तुळशी मी मंजिरी ।
तूं पावा मी मोहरी । स्वये दोन्ही ॥
तूं चांद मी चांदणी । तूं नाग मी पद्मिनी ।
तूं कृष्णा मी रुक्मिणी । स्वये दोन्ही ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



तूं नदी मी थडी । तूं तारु मी सांगडी ।।
तूं धनुष्य मी भातोडी । स्वये दोन्ही ।।
तूं वेद मी स्तविता । तूं शास्त्री मी गीत गीता ।
तूं गंध मी अक्षता । स्वये दोन्ही ।।
नामा म्हणे पुरुषोत्तमा । स्वये जडलों तुझ्या प्रेमा ।
मी कुडी तू आत्मा । स्वये दोन्ही ।। '

या अद्वयानंदाचा सोहळा त्यांना एका भक्तीतून, नामस्मरणातून प्राप्त झालेला होता. तथापि भक्तीपूर्व ज्ञानाचा वाटाही त्यात मोठा होता, आणि त्यामुळे ' मुक्तालाही काही कर्तव्य उरते ' या भावनेने ' नाचूं कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ' हा लोकोद्धाराचा वसा त्यांनी आता आपल्या हाती घेतला होता.

## भक्ती हीच अंतिम जीवननिष्ठा

नामदेवांना आत्मदर्शन झालं. अंतरात्मा आणि परमात्मा यांचे मीलन झाले. त्यांना या कैवल्याची प्राप्ती झाली. तथापि जे प्राप्तार्थ झाले आणि निष्कामना पावले, त्यांनाही भगवंताने कर्म सांगितलेच आहे. नामदेव त्याच्या आदेशाप्रमाणे ' नाचू कीर्तनाचे रंगीं, ज्ञानदीप लावू जगीं ' या तत्त्वानुसार आचरण करू लागले. परमात्मभेटी झाल्यानंतरही भक्तीचे आचरण करीत राहणे आणि इतरांना ज्ञान देऊन भक्तिमार्गाला लावणे अशी दुहेरी कर्तव्यकर्मे त्यांनी अंगिकारलीं. ज्ञानदेवांप्रमाणेच नामदेवांनीही भुक्ती हीच

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



श्रेष्ठ जीवननिष्ठा कधीच मानली नाही. मुक्ती प्राप्त झाल्यानंतर-ही परमात्मप्रीतीचा लाभ सतत होत राहावा म्हणून मुक्तीपेक्षाही भक्तीच त्यांनी श्रेष्ठ मानली आणि त्यानुसार साक्षात्कार झाल्या-नंतरही नामदेव भक्तिप्रेमलहरी अनुभवीत राहिले. भागवतधर्माचे हेच खरे वर्म आहे. प्रेमपिसे भरून हा नामदेव राऊळी अत्यानंदाने नाचू लागला, गाऊ लागला. प्रेमपाशानं त्यांनी पंढरीच्या विठो-बाला आपल्या भावविश्वाशी जखडून ठेवलं होतं. जन्माचं मोल देऊन जोडलेले हरिचरण सोडण्यास त्यांचं मन तयार नव्हतं. ते देवास म्हणू लागले—

'आजवर मी जाणिवेचं ओझं वाहिलं, आणि तुझ्या चरणास अंतरलो होतो. आता देवा, आपण मला नेणते करा, देही न दिसेल असे करा. तुझी सुकुमार पाउले हे माझे विटेवरील माहेरच असून तेथे माझ्या मनाने बुडी दिली आहे. त्या चरणांचे अनुसंधान तुटले तर तत्क्षणीच माझा प्राण जाईल. माझे मन आणि तुझे चरण यांची जणू एकत्र गाठ दिली असून जन्मोजन्मी तुझे पाय सेवावेत असे माझे सौभाग्य आहे. मुखी नाम आणि हृदयी प्रेम हाच माझा नेम.'

नामदेव जीवन्मुक्त झाले याचा अर्थ त्यांचा लौकिकाचा संबंध तुटला असा नाही. उलट विश्वात्मक परमात्म्याचं दर्शन झाल्यानं त्यांना 'जनातच जनार्दन आहे' असा अनुभव येऊ लागला. आणि म्हणून प्रसन्न झालेल्या परमात्म्याला ते मागणं मागू लागले—

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



'पंढरीचा वास चंद्रभागें स्नान । आणिक दर्शन विठोबाचें ।।
हेचि घडो मज जन्माजन्मांतरीं । मागणे श्रीहरी नाहीं दुजें ।।
मुखीं नाम सदा संतांचें दर्शन । जनीं जनार्दन ऐसा भाव ।।'

किती सोपं आणि निःस्वार्थ मागणं मागितलं नामदेवांनी! पंढरीचा वास, संतांचा सहवास, मुखी नाम आणि जनता-जनार्दनाचे काम. एवढ्यातच त्यांनी आपलं जीवन सीमित करून घेतलं होतं. ते देवाला प्रार्थना करताना म्हणू लागले –

देवा, तुझे ध्यान हेच माझं संध्यास्नान, तुझे चरण हीच माझी समाधि. हरिकथा हीच माझी विश्रांती! श्रीमुख सदैव दिसावे एवढा अधिकार मला कोठून असणार? म्हणून मला आपली चरणसेवा द्या, म्हणचे पुरे. तुझे भक्तिसुख मिळावे, एवढीच माझ्या अंतरीची आस राहिली आहे.'

अशाप्रकारे नामदेव परमेश्वराच्या भेटीनंतर परमात्मभक्ती-तच विरून गेले होते. भक्ती हीच त्यांची अंतिम जीवननिष्ठा बनली होती. 'चारी पुरुषार्थ शिरी पाय देणारी ही भक्ती पंचम पुरुषार्थ आहे, हे ज्ञानदेव निरूपित भक्तितत्त्व ते अनुभवीत होते.

## नामदेवांचा भक्तिमार्ग

भक्तीचा सर्वांत महत्त्वाचा विशेष हा की, तिनं जीवनाशी अतूट नातं जोडलं आहे. त्यामुळे जीवनात प्राप्त होणारी कर्तव्यकर्मे आचरूनही भक्तीचे आचरण करता येते. भक्ती मानवी जीवनाला

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



निगडित असल्यामुळे मानवी जीवनाला ती विवेकनिष्ठेचे आवारू घालते, मानवी जीवनात नैतिक परिशुद्धी घडवून आणते, त्यामुळे ते सदाचारसंपन्न होते, परमार्थमय होते. नामदेवांनी उपदेशिलेला भक्तिमार्ग हा मानवी जीवनाच्या कल्याणाची काळजी वाहणारा कसा आहे, हे पाहणे त्यामुळे आवश्यक ठरते.

सकल लोकसंस्थेच्या उद्धाराचा मार्ग सांगताना नामदेव प्रथम इशारा देतात की, मानवी देह हा क्षणाक्षणाला काळाच्या आधीन होत जाणारा नाशिवंत आहे, हे लक्षात घेऊन देह सुदृढ आहे, तोपर्यंतच परमात्मप्राप्तीचा लाभ प्राप्त करून घ्यायला लागा. हिताहिताचा विचार करून स्वहित आचरा, वासनेची शांती करा, मानसन्मानाची चाड सोडा, अंतकाळचे कोणी नाही हे समजून दंभ, अभिमान, मोह सोडून देवास अनन्यभावानं शरण जा. हरिनामास क्षणभरही विसरू नका, शुद्धाचरण न सोडता पोटी धीर धरा, लौकिकाची लाज न धरता निजकाज साधा, जग निंदील त्यास सुखे निंदूद्यात, विषयांचा पसारा सोडा, निशिदिनी विठ्ठल आठवा, काही आत्महित करा, असे नामदेवांचे सर्वांना सांगणे आहे.

नामदेवांनी आपल्या भक्तिमार्गात समत्वदृष्टी प्रस्थापित केली.

परमेश्वर हा चराचरात भरून राहिलेला आहे. प्रत्येक प्राणिमात्रात आत्मरूपानं स्थित आहे. त्यामुळे भूतदया हा आपला धर्म मानून परमार्थात सर्व जातींतील, सर्व वर्णांतील स्त्रीपुरुषांनी परस्परांशी समत्वदृष्टीने वागले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



'येथे जातिव्यक्ती पडे बिंदुले' हा ज्ञानदेवाचा संदेश उरी बाळगून त्यांनी आपल्या भक्तिमार्गात सर्व थरांतील लोकांना एकत्र आणले आणि पंढरपूर हे एक समतेचे पीठच स्थापन केले.

नामदेवांना परमार्थात घुसलेले बाह्य उपचार अमान्य होते. एका भक्तीशिवाय, नामस्मरणाशिवाय अन्य उपाय हे परमार्थात अपायकारक आहेत, असे त्यांनी वारंवार सांगितले. त्यांच्या काळातही अन्यथा ज्ञान सांगून अभिमान वाहणारे आणि अज्ञजनांस फसविणारे लोक होतेच. त्यांना उद्देशून नामदेव म्हणतात, 'यंत्र, मंत्र दीक्षा अनेकजण सांगतील, परंतु राम प्रत्यक्ष कोणीही दाखविणार नाही. जो कोणी प्रत्यक्ष रामतत्त्व अनुभवाला आणील, त्याचे मी पाय धरीन. इतरांची चाड मला नाही. ज्याचे चित्ती निरंतर समाधन आहे, तोच खरा ब्राह्मण. इतर वेदपरायण' ग्रंथाचे केवळ राखण' म्हणून माझा नमस्कार. मुखात नाम आणि मनात काम' अशा दांभिकांना भक्तिसुख समजणार नाही. भक्तिसुखाच्या अनुभवासाठी अंतःकरणाची आर्त निर्माण व्हायला हवी. सर्वांभूती विठ्ठल आहे हे जाणून दृष्टीचे देखणे, ऐकणे आणि मनाचे एक विठ्ठलमात्र करा. संत हे देवाचे आत्मे आहेत हे जाणून त्यांचे पाय धरा नामसंकीर्तन, संतसंगती तुम्हांस पैलपार पाववील, असे नामदेवांनी आपल्या भक्तिमार्गाचे गुह्य इतरांना सांगितले.

## नामदेवांची नामभक्ती

नामदेवांनी केलेली साधना आणि भक्तिमार्गाविषयी केलेला उपदेश आपण पाहिला. त्यात आपणास असे दिसून आले असेल

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


की, 'नामस्मरणा'ला आपल्या भक्तिमार्गात अनन्यसाधारण महत्व दिले आहे आणि त्यामुळेच आपणास असेही म्हणण्याचा मोह होतो की, 'नाम हाच ज्यांचा देव ते नामदेव'! नामस्मरण हाच त्यांच्या भक्तिमार्गाचा गाभा आहे. त्यांनी आपल्या अभंग-वाङ्मयात सर्वत्र नाममहिमा गायिला आहे. ते म्हणतात –

'देव साकार होऊन नामरूपास येत असल्यामुळे नाम आणि रूप ही एकत्र होत; आणि म्हणून देव जोडण्याचा नामापरता मंत्र नाही. नामसाधन हीं हरिदर्शनासाठी पावला–पावलाने होणारी वाटचाल आहे. त्यात उच्च–नीच हा भेद नाही. काळ–वेळ हेही बंधन राहत नाही. शिवाय 'नामा'त 'स्मरण' ही आहे. त्यामुळे नामाच्या दोरीनं परमेश्वराला खेचून आणून आपल्या स्मरणाच्या संपुष्टात सदैव ठेवता येते. हे नामस्मरणाचे अनन्यसाधारण वैशिष्ट्य आहे असे ते म्हणतात. ध्यानपूर्वक केलेले नामस्मरण अशाप्रकारे परमेश्वराचे सान्निधान सदैव प्राप्त करून देते आणि म्हणूनच नामस्मरणावरील आपला विश्वास व्यक्त करताना परमेश्वरालाही ते म्हणतात —

लपलासी तरी नाम कोठें नेसी। आम्ही अहर्निसी नाम गाऊं॥
आम्हांपासुनिया जाता न ये तुज। तें हें वर्मबीज नाम घोकूं॥
आम्हांसि तो तुझे नामचि पाहिजे। मग भेटी सहजे देणे लागे॥
भोळी भक्ते आम्ही चुकलों होतो वर्म। सांपडले नाम नामावळी॥

अशा प्रकारे केवळ नामस्मरणाच्या आधारे नामदेव परमेश्वराला खेचून आणण्याची भाषा मोठ्या आत्मविश्वासाने बोलतात. त्यात एकप्रकारचे रहस्य दडलेले आहे. नामस्मरणात मनावर होणारे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



आत्म्याव्यतिरिक्त संस्कार पुसून केवळ आत्म्याचे संस्कार करावयाचे असतात. ते दृढ झाले म्हणजे आत्मज्योत प्रज्वलित होते आणि परमात्मरूप अनंत तेजाशी मिळून जाते. हेच ते रहस्य होय; आणि म्हणून नामस्मरणातून साक्षात् निर्गुणाची प्राप्ती होते असे म्हटले जाते आणि म्हणून नामदेव म्हणतात –

‘ नाम घेतां भगवंताचे । पाश तुटती भवाचे ॥
जे जे नामीं रत झाले । ते ते केशवे तारिले ॥
महा गणिका दुराचारी । नामे तारिली अहिल्या नारी ॥
महापापी अजामेळ । तोही तारीला चांडाळ ॥
नामे गजेन्द्र तारिला । देवे मोक्षपदी नेला ॥
नाम घेतसे पांचाळी । उभा समीप वनमाळी ॥
नामा म्हणे भाविकांसी । घ्या नाम रे अहर्निशी ॥ ’
‘ जयासी लागलीं रामनामी गोडी ।
त्याने केली प्रौढी परमार्थाची ॥

कलिमाजी नाम सुलभ सोपेरे । या लागी आदर नामीं धरा ॥
आणिक साधने आहेत उदंड । सेविता वितंड कष्ट तेथें ॥
सोवळें ओवळे उंच नीच वर्ण । नाही येथें गुणदोष काही ॥
नामा म्हणें सर्व सिद्धांतांचा भाव । प्राणियांचे दैव कोण जाणें ॥ ’

‘ नाम हे साराचे सार आहे. तीर्थाचे तीर्थ आहे, मंत्राचा मंत्र आहे, अक्षय सुखाचे साधन आहे. मुक्तीचे माहेर आहे; आणि

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



म्हणून नाम हेच संध्यास्नान, नाम हीच संजीवनी आणि नाम हेच मुक्तिस्थान,' असा त्यांनी सिद्धान्त सांगितला आहे.

'नामीं नारायण। होय भक्तांचे अधीन' जेथें नामसंकीर्तनाचा सुरुंग, तेथे स्वयमेव पांडुरंग आहेत असे समजावे. देवाला कीर्तनाची गोडी आहे. 'कीर्तनाच्या सुखें सुखी होतो देव' त्याला उणें काय पडणार? जो रामनाम घेतो, तोच रामरूप होतो. म्हणून चोखडे पवित्र हरिनाम घेत जा आणि गळ्यात रामकृष्णनामाची अखंड माळा घाला. तुम्ही बंधमुक्त व्हाल, कीर्ती पावाल, थोर सुख मिळवाल, उद्धरून जाल, आणि जर हे खोटे ठरले, तर माझे मस्तक छेदून टाका, असंही आत्मविश्वासानं नामदेव सांगून गेले !

आणि म्हणून सर्व सारांचे सार सांगताना नामदेव म्हणतात —

'जागा रे गोपाळांनो; रामनामीं जागा !'

## तीर्थयात्रा

नामदेवांच्या जीवनात ज्ञानदेवांनी क्रांती घडवून आणली. विसोबा खेचरांकडून ज्ञान घेण्याची प्रेरणा ज्ञानदेवांनी त्यांच्या ठायी निर्माण केली. म्हणून नामदेवांना निर्गुणनिराकाराची ओळख पटली. अन्यथा ते भोळेभक्त म्हणून सगुणाच्या उंबरठ्यावरच ठेचाळत राहिले असते. तेव्हापासून नामदेवांच्या भावविश्वात गुरु इतकेच ज्ञानदेवांना श्रेष्ठ स्थान प्राप्त झाले. ज्ञानदेवांनाही त्यांच्या उत्कट भक्तीचा विलक्षण मोह वाटू लागला; आणि त्यामुळे या दोघांना परस्परांचा सहवास 'येथे हृदया हृदय येक झाले' असा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



वाटू लागला. एकदा ज्ञानदेवांच्या मनात आलं, आपण तीर्थयात्रेला जावं. त्यांनी आपला हा विचार नामदेवांना बोलून दाखविला. नामदेवाचं मन पंढरीतून निघणं शक्य नव्हतं. पंढरीचा अल्प-काळाचा वियोग ही कल्पना देखील त्यांना असह्य वाटत होती. प्रथमदर्शनी त्यांनी ज्ञानदेवांना जवळ जवळ नकारच दिला होता. परंतु तीर्थयात्रेत पांडुरंगाचे नामस्मरण करीत राहिल्यास तो राह-णार या कल्पनेचा आधार घेऊन ते ज्ञानदेवांबरोबर यात्रेस निघाले. शके १२१३ ते १२१८ हा त्यांच्या तीर्थयात्रेचा काळ सांगितला जातो. या यात्रेत ज्ञानदेव, नामदेव, गोरोबाकुंभार, विसोबा खेचर परिसा भागवत इत्यादी थोर संत समाविष्ट झाले असल्यामुळे तिला अभूतपूर्व स्वरूप प्राप्त झाले होते. ‘ तुम्ही तीर्थ न वचावे ’ असे भक्तीचे माहात्म्य सांगताना म्हणणारे ज्ञानदेव स्वतः तीर्थ-यात्रेला निघतात तेव्हा त्यांच्या मनात काही एक उद्देश असलाच पाहिजे यात संशय नाही. भागवताची ही पताका समत्वभावाने खांद्यावर घेऊन पारमार्थिक क्षेत्रातील समतेचा डांगोरा पिटीत त्यांना उत्तरेतही हे आध्यात्मिक लोकशाहीचे लोण पोचवावयाचे होते. त्याच बरोबर सर्व संत एकत्र येऊन संतसंगाचा अपूर्व सोहळा सर्वांच्या अनुभवाला आणायचा होता.

तीर्थयात्रेच्या या काळात ज्ञानदेवांनी नामदेवांच्या आर्त भक्तीचं सुख प्रत्यक्ष डोळ्यांनी अनुभवलं. ते स्वतः योगी, त्यामुळे ज्ञान आणि योगमार्ग या दोन प्रभावी साधनमार्गांनी पारमार्थिक अनुभवाची परमोच्च उंची गाठणाऱ्या ज्ञानदेवांना भक्तिसुख काहीसं दूर राहिलं होतं. ते नामदेवांच्या सहवासानं प्रत्यक्ष अनु-भवाला आलं. नामदेव हे परमभक्त. परंतु परमात्मस्वरूपाचे ज्ञान गुरुमुखातून झालं असलं तरी आत्मानात्म विचाराच्या खोलात ते

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



फारसे शिरले नव्हते. परंतु तीर्थयात्रेच्या या काळात ज्ञानदेवांच्या मुखातून, त्यांच्या प्रवचनातून त्यांना आत्मनात्म--विवेकाचे गहन-गूढ विचार ऐकायला मिळाले. त्यामुळे परस्परांना परस्परांचा सहवास जीवनाला पूर्णत्व आणणारा आणि म्हणुन चैतन्यदायी ठरला असेल यात नवल नाही. या यात्रेच्या काळात ज्ञानदेवांना नामदेवांचे करुणासागर बनलेलं अथांग अंतःकरण अनुभवाला आलं. तर नामदेवांना या योगीयांच्या, ज्ञानीयांच्या राजाचं विश्वाचं आर्धोक्षण करू जाणारं आध्यात्मिक सामर्थ्य अनुभवाला आलं. वाराणसीच्या दशाश्वमेध घाटावर त्यांच्या या यात्रेची स्मृती 'ज्ञानेश्वरमठ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मठाच्या प्रांगणातील एका स्तंभावर कोरली गेली आहे. संवत् १३५१ ( शके १२१६) हा काळ त्यावर नोंदवलेला आहे.

महाराष्ट्रात परत आल्यानंतर नामदेव दक्षिणेकडची तीर्थयात्रा करून आले. श्रीशैल मल्लिकार्जुन, अरुणाचल, चिदंबर, विष्णु-कांची, सेतुबंध रामेश्वर, कन्याकुमारी, हरिहरेश्वर अशी अनेक तीर्थक्षेत्रे करून पुन्हा महाराष्ट्रात आले.

दक्षिणची तीर्थयात्रा उरकून नामदेव उत्तरेत पुन्हा तीर्थयात्रेस गेले होते. पुन्हा अनेक तीर्थक्षेत्रांना भेट देऊन काही काळ विश्वेश्वराच्या वाराणसीत राहून पुन्हा महाराष्ट्रात आले.

## पंजाबातील कार्य

दक्षिणेची यात्रा, उत्तरेतील दोन यात्रा अशा एकूण तीन यात्र करून नामदेव तिसऱ्यांदा उत्तरेत गेले ते प्रदीर्घ वास्तव्यासाठी शके १२६१ ला केलेल्या यात्रेत ते हरद्वारहून पंजाबकडे गेले

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



पंजाबात त्यांना बाबा बहरेदास हा अनुयायी येऊन मिळाला. पाठोपाठ आणखी काही शिष्य येऊन मिळाले आणि पंजाबात भक्तिपंथाचा प्रसार जोरदारपणे होऊ लागला. नामदेवांच्या व्यक्तिमत्वाचा आणि त्यांनी निरूपलेल्या भक्तिमार्गाचा पंजाबात इतका प्रभाव पडला की गावोगावी त्यांची स्मृतिमंदिरे उभारली गेली. हिंदी भाषेतील काव्यरचना याच सुमारास झाली. मराठी अभंगांत उमटलेली आर्त भक्ती हिंदी काव्यातही तितक्याच उत्कटतेने व्यक्त होऊ लागली. मराठी अभंगांतून व्यक्त झालेलं भक्तिपंथातील नीतिशास्त्र हिंदीतून व्यक्त होऊ लागलं. त्यांच्या हिंदीतील पारमार्थिक विचारांचा प्रभाव इतका पडला की पुढे ‘ ग्रंथसाहेबा ’ तही त्यातील काही पदांचा समावेश झाला.

‘ गुरुद्वारा बाबा नामदेवजी ’ या नावानं ओळखलं जाणारं पंजाबात ‘ घुमान ’ येथे नामदेवांचे स्मारक आहे, आणि या गुरुद्वारात ‘ बाबा नामदेवजी की समाधी ’ या नावाने ओळखले जाणारे नामदेवांचे समाधिमंदिर आहे. उत्तरेकडील, विशेषतः पंजाबमधील लोकांची अशी समजूत आहे की, माघ शुद्ध २, संवत् १५०७ या दिवशी पंजाबातील ‘ घुमान ’ या ठिकाणी नामदेवांनी समाधी घेतली. संवत् १५०७ म्हणजे शके १३७२. महाराष्ट्रात मात्र आषाढ वद्य १३, शके १२७२ ही नामदेवांची समाधीतिथी आज सर्वमान्य झालेली आहे. म्हणजे महाराष्ट्रात मान्य झालेल्या त्यांच्या समाधितिथीनंतर १०० वर्षांनी नामदेवांनी घुमान येथे समाधी घेतली असे मान्य करावे लागते. परंतु हे कोणालाही पटणारे नाही. कारण, महाराष्ट्रात रूढ असलेल्या समाधिशंकानुसार पाहिले, तर नामदेवांना ८० वर्षांचे प्रदीर्घ आयुष्य लाभले होते. त्या शकानंतर १०० वर्षांनी म्हणजे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



संवत् १५०७ ला नामदेवांनी घुमना येथे समाधी घेतली हे शक्य आणि वास्तव वाटत नाही. त्यामुळे 'घुमान' येथील नामदेवांची समाधी मूळची समाधी नसावी असे म्हणावे लागते.

## नामदेवांची पायरी हेच समाधीस्थान

नामदेव उत्तरेत आणि विशेषकरून पंजाबात प्रदीर्घ वास्तव्य करून आपल्या अंतःकरण-प्रवृत्तींना अनुसरून पंढरीच्या ओढीने



पुन्हा महाराष्ट्रात आले आणि पंढरपूरला अंतकाळचे वास्तव्य करून राहिले. ज्या विठ्ठलाचा वियोग त्यांना क्षणभर कल्पनेत देखील सहन होत नसे, त्या विठ्ठलाच्या प्रदीर्घ वियोगानंतर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



नामदेव पंढरपूरला आले. या वृद्धापकाळात पांडुरंगाच्या दर्शनानं त्याचं देहभान पार नाहीसं झालं होतं, आणि आता विठ्ठलरूपात विरुन जाण्याची अंतिम इच्छा अनिवार्य झाली होती. मनाच्या अशा उन्मनी स्थितीतच नामदेव पंढरपूरला महाद्वाराच्या पायरीशी आषाढ वद्य १३, शके १५७२ ला समाधिस्थ झाले.

पंढरपूरच्या विठ्ठलमंदिराच्या पूर्वेकडील द्वारास महाद्वार म्हणतात. या महाद्वारातून भक्त लोकांच्या जाण्या-येण्याचा अधिक राबता असतो. या महाद्वारापर्यंत जाण्यास अनेक पायऱ्या चढून जावे लागते. त्यांतील पहिल्या पायरीस 'नामदेवांची पायरी' असे म्हणतात. महात्मे जेथं स्वतःचा देह ठेवतात, त्याच जागी त्यांचे स्मारक उभारले जाते व त्यालाच कालांतराने समाधि म्हटले जाते. नामदेवांनी पांडुरंगाच्या दर्शनासाठी येणाऱ्या अनेक भक्तांचे पाय आपल्या मस्तकी लागावेत म्हणून देवाजवळ या जागेची मागणी केली; आणि म्हणून या पायरीस 'नामदेवांची पायरी' असे नाव पडले, अशी सर्वांची श्रद्धा आहे. वर चढताना उजव्या हातास या पायरीवर नामदेवांचा पितळी मुखवटा ठेवला जातो.

नामदेवांनी देवाला आयुष्यभर विनवलं होतं.–'वैकुंठी आम्हां नको धाडूं हरी वास दे पंढरीं सर्व काळ.' त्यांना चिंता आयुष्य भर वाटली ती एकाच गोष्टीची, की देवानं आपल्याला मुक्ती दिली तर आपण कायमचे भक्तिसुखाला, संतसंगाला, पंढरी-निवासाला पारखे होऊ; आणि म्हणून नामदेवांनी महाद्वाराच्या पायरीशी समाधी घ्यायची युक्ती काढली. नामदेव म्हणतात –

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



'तुझे चरण देखोनी हरली भवव्यथा ।
पुढती एक चिंता वाटे थोर ।।
झणी मज मुक्ती देसी पांडुरंगा ।
मग मी संतसंगा केवी मिळे ।।
पंढरीचा आनंद हा सुख सोहळा ।
कवणाचिया डोळा पाही जाऊं ।।
तुझ्या कथा मज अमृतसंजीवनी ।
कवणाचि या श्रवणीं ऐको जाऊं ।।
म्हणोनी माझ्या जीवा वाटे जडभारी ।
उदास मुरारी करिसी झणी ।।
नामा म्हणे मज तुझी चरणसेवा ।
जन्मोजन्मी देव द्यावी मज ।।'

मुक्तीलाही 'परते सर' म्हणून दूर लोटणाऱ्या नामदेवांना जन्मोजन्मी भक्तिसुख हवं होतं. संतसंग हवा होता. पंढरीनिवास हवा होता. महाद्वाराशी पायरीवर समाधी घेतल्यानं त्यांना या तिन्ही गोष्टी प्राप्त झालेल्या होत्या. जन्मोजन्मीच्या सुखाची सोय त्यांनी इथं पायरीपाशी करून ठेवली होती —

नामा म्हणे आम्ही पायरीचे चिरे ।
संत पाय हिरे वरी देती ।।

विठ्ठलाकडे धावत येणाऱ्या भक्तांच्या पायाचे धूळिकण भक्त नामदेवांच्या भावविश्वात कायमचे हिरे बनलेले होते ! या पायरीचा चिरा आज सातशे वर्षे समचरण विठ्ठलाच्या समत्वबुद्धीनं केलेल्या भक्तीचा दिव्य संदेश अखिल मानवजातीला देत आहे.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



# नामयाची अमृतवाणी

नामदेव अंतःकरणानं हळूवार होते. संवेदनशील होते. आयुष्य-भर ते अंतर्मुख वृत्तीनंच वावरले. त्यामुळे त्यांच्या अंतरीचे सारे आर्त त्यांच्या अभंगवाणीत स्वाभाविकपणे व्यक्त झाले आहे. त्यांचा एकेक अभंग म्हणजे त्यांच्या पारमार्थिक जीवनाचं दर्शन घडविणारं एकेक भावगीत आहे. त्या भावगीतांतून सुगंध दरवळतो तो त्यांच्या अंतःकरणातील असीम आणि उत्कट भक्तीचा. त्यांचं सारं भावविश्व विठ्ठलमय होऊन गेलं होतं आणि म्हणून त्यांना सर्वत्र विठ्ठलाचाच अनुभव येत होता –

जीव विठ्ठल आत्मा विठ्ठल । परमात्मा विठ्ठल विठ्ठल ।।
जनक विठ्ठल जननी विठ्ठल । सोयरा विठ्ठल सांगाती ।।
आह्निक विठ्ठल पात्र विठ्ठल । निरंतर विठ्ठल दाविता ।।
नाम विठ्ठल रूप विठ्ठल । पतित पावन विठ्ठल विठ्ठल नाम ।।
तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल । देव विठ्ठल देवपूजा विठ्ठल ।।
माता विठ्ठल पिता विठ्ठल । बंधु विठ्ठल गोत्र विठ्ठल ।।
गुरु विठ्ठल गुरु देवता विठ्ठल । निधान निरंतर विठ्ठल ।।
नामा म्हणे मज विठ्ठल सांपडला । म्हणोनि कळिकळा पाड नाही ।।

नामदेवांची समस्त अभंगवाणी आत्मनिष्ठ भूमिकेतून आकारास आलेली असल्यामुळे त्यांच्या पारमार्थिक जीवनाचा संपूर्ण

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



पट त्याद्वारे उलगडून दाखविता येतो. भक्त नामदेवांची ती आत्मनिष्ठ भावगीतंच आहेत. नामदेवांच्या नावावर असलेली एकूण अभंगगाथा पाहिली तर ती विपूल आहे. त्यांत नामा म्हणे, म्हणे नामा, विष्णुदास नामा, नामदेव अशा विविध नाममुद्रा आहेत. शिवाय मराठीत अभंगरचना करणारे आपल्याला अभिप्रेत असलेले ज्ञानदेवकालीन नामदेव, नामापाठक, नामा यशवंत, विष्णुदास नामा, महानुभावीय नामदेव, नामाशिंपी असे अनेक नामदेव होऊन गेले. या सर्व नामदेवांच्या अभंगांचा सरमिसळ नामदेवअभंगगाथेत झालेली असल्यामुळे नेमके नामदेवांचे अभंग कोणते हे निश्चित सांगणे अजूनही कठीण झाले आहे. तथापि 'नामा म्हणे' आणि 'म्हणे नामा' अशा नाममुद्रा असलेले आणि सर्वसाधारणपणे भाषेचे प्राचीनत्व दाखविणारे अभंग तारतम्याने घेतले, तर ज्ञानदेवकालीन नामदेवांचे मोजकेच अभंग निघतात. परंतु त्या मोजक्या अभंगांतूनही एका थोर भक्ताचे समत्वबुद्धी पावलेल्या थोर पारमार्थिकाचे, देवरूप पावलेल्या संतांचे अत्यंत हळूवार आणि संवेदनशील अंतःकरणाच्या भावकीचे आणि उत्तरे-पर्यंत भागवताची पताका फडकविणाऱ्या पंथप्रचारकाचे विभूति-मत्त्व अनुभवाला आल्याशिवाय राहात नाही. एका उत्कट भक्तीतून वैश्विक कारुण्याचा अनुभव घेणाऱ्या नामदेवांच्या अंतरंगाचं मनोज्ञ दर्शन या अभंगवाङ्मयातून घडते.

त्यांची अभंगवाणी ज्ञानदेवांप्रमाणे विराट कल्पनाशक्ती व्यक्त करताना दिसत नाही. गहनगूढ अशा आत्मनात्म तत्त्वज्ञानाची

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


तार्किक मांडणी करण्याचा सोसही तिच्यात दिसून येत नाही. स्वतःचे गुरुत्व सिद्ध करण्यासाठी तिने थोर उपदेशकाची भूमिकाही कधी व्यक्त केलेली दिसत नाही. परंतु तिच्यात अंतःकरण हलवून सोडणारे जे काही आहे ते भावसौंदर्य आहे. त्यांनी आपल्या पारमार्थिक जीवनात जे जे काही अनुभवलं ते ते कमालीच्या हळुवार अंतःकरणानं, आत्मनिष्ठ भूमिकेतून सहजपणे शब्दबद्ध केलं, आणि त्यामुळे नामदेवांचे अभंग आपल्या अंतःकरणाला हळुवारपणे स्पर्श करतात आणि आपल्यालाही अंतर्मुख करतात. अंतःकरणावर संस्कार करण्याचं, त्याला उदात्ताचा अनुभव देण्याचं, मनाला उन्मन करण्याचं, आचारशुद्धीचं आणि विचारजागृतीचं विलक्षण सामर्थ्य त्यांच्या अभंगवाणीला प्राप्त झालेलं आहे. आपल्याला काव्यनिर्मिती करायची आहे, अशी जाणीव ज्ञानदेवांप्रमाणं तिनं कधीच व्यक्त केली नाही. त्यांचे काव्य नेणिवेतून निर्माण झालेलं आहे. हाती टाळ आणि खांद्यावर वीणा घेतली की, नामदेव हे जग विसरतात. अंतर्मुखतेची खोलवर डूब घेतात आणि अशा अवस्थेत परमात्म-प्रीतीनं त्यांना जे स्फुरतं ते आपोआप अभंगरूप धारण करतं. असंच त्यांच्या काव्यनिर्मितीच्या बाबतीत वाटू लागतं. 'नामयाची वाणी अमृताची खाणी' असं जे म्हटलं जातं ते यामुळेच. पंढरपूर, पांडुरंग आणि त्याची भक्ती या तीन विषयांखेरीज तिनं अन्य विषयाला स्पर्श केला नाही. पण या तीन विषयांना व्यापून टाकणारं त्यांचं अंतःकरणच इतकं विशाल आणि व्यापक होतं की, त्याचा परीघ आपल्याही अंतःकरणाला

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


कारुण्याचे पाझर फोडतो आणि या करुणा-सागराशी आपलं कारुण्य समरसून जातं. आपण आपले उरतच नाही.

नामदेवांचा उत्कट भक्तिभाव कोठलीही काथ्पलेणी न लेता अंगभूत सौंदर्यानं चित्ताचा ठाव घेतोच, परंतु त्यांचं जिज्ञासू मन पंडितांना, ज्ञानी शास्त्रज्ञांना जीवितसाफल्याची वाट पुसायला जातं, त्या वेळी आलेला कटु अनुभवही प्रामाणिकपणानं व्यक्त करतं –

तत्त्व पुसाया गेलो वेदज्ञासी । तंव भरले त्यापासी विधिनिषेध ॥
तया समाधान नुमजे कोणे काळी । अहंकार बळी झाला तेथें ॥
म्हणोनि तुझें नाम धरिलें सर्वभावें । उचित करावें पांडुरंगा ॥
स्वरूप पुसावया गेलो शास्त्रज्ञांसी । तव भरले तयापाशी भेदाभेद
एकएकांच्या न मिळती मतांसी । भ्रांत गर्वराशी भुलले सदा ॥
पुराणिकासी पुसूं स्वरूपाची स्थिती ।
तव त्यासी विश्रांती नाही कोठें ॥

विषयीं ठेवुनी मन सांगती ब्रह्मज्ञान । तेणें समाधान नुपजे कदा ॥
हरिदासासी पुसूं भक्तीचा उपाया तंव तयापाशी नाही भाव कोठे ॥
वाचेने सांगती नामाचा बडिवार । विषयीं पडिभर कदाकाळीं ॥
ऐसें विचारतां बहुत भागलो । म्हणोनि शरण आलो पांडुरंगा ॥
भयाभीत झालों संसार करीता । नामा म्हणें आतां तारी मज ॥

परमार्थाला प्राप्त झालेल्या तत्कालीन विपरीत परिस्थितीचं अवलोकन करूनच नामदेव अंतःकरण प्रवृत्तीशी म्हणजे अंत-

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



रीच्या उत्कट भक्तीशी प्रामाणिक राहिले आणि म्हणून त्यांच्या उत्कट भक्तीला सहज, स्वाभाविक असं सौंदर्य प्राप्त झालं.

नामदेव स्वतःकडे वत्साची भूमिका घेतात आणि विठू माऊलीला वाहतात. ‘पक्षिणी प्रभाती चारियासी जाये। पिलूं वाट पाहे उपवासी,’ ‘तूं माझी माऊली मी वो तुझा तान्हा। पाजी प्रेम पान्हा पांडुरंगे,’ ‘विसावा विठ्ठल सुखाची साऊली। प्रेम पान्हा घाली भक्तांवरी। ‘भेटीलागे जीवा लागलीसे आस। पाहे रात्रिंदिवस वाट तुझी।’ इत्यादी अनेक अभंगांतून व्यक्त होणारी नामदेवांच्या भक्तीची आर्त कोणालाही भुरळ घालण्यासारखीच वाटते. त्यांच्या निर्व्याज, भावकोमल, हळुवार, संवेदनशील अंतःकरणाचे मनोज्ञ दर्शन या अभंगवाणीतून घडते. परमात्मभेटीची तळमळ लागून राहिलेल्या त्यांच्या आत्म्याचे आक्रंदनच त्यातून ऐकायला मिळते.

## पंढरपूर आणि श्रीविठ्ठल

नामदेव पंढरपूरचे अतिशयोक्तीचा आधार घेऊन वर्णन करतात–’ आधी रचिली पंढरी। मग वैकुंठ नगरी। जेव्हा नव्हतें चराचर। तेव्हां होते पंढरपूर। जेव्हां नव्हती गोदागंगा। तेव्हा होती चंद्रभागा। नासिलीया भूमंडळ। उरे पंढरी मंडळ।। असे सुदर्शनावरी। म्हणुनी अविनाश पंढरी।।’ या अतिशयोक्तीतून नामदेवांना त्यांच्या भावविश्वात आदी अंती पंढरीच कशी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



दिसत होती, त्याचे हृद्य दर्शन घडते. पांडुरंग क्षेत्रावाचून या भूमंडळी अन्य क्षेत्र नाही असे त्यांना वाटते. पंढरपूराला नित्य दिवाळी आहे. त्रिभुवनीची तीर्थे पावन व्हायला पंढरपूरला येतात, तेथे प्रत्यक्ष परब्रह्म भेटते; आणि म्हणून त्यांना वैकुंठही नको वाटते. सदा सर्वकाळ पंढरीचा वास पाहिजे आहे.

नामदेवांचें जे प्रेयस श्री विठ्ठलरूपानं त्यांच्या भावविश्वात नटलं आहे, त्याचं परोपरीन वर्णन त्यांनी केलं आहे. सावळे परब्रह्म असणारा श्रीकृष्ण विठ्ठलरूपानं नटला आहे, अशी त्यांची श्रद्धा होती. 'हरी हर विरंचो त्रिमूर्ती हाचि । ' माऊली दीनांची लाभापर ॥' शिव, विष्णु, ब्रह्मा हे या विठ्ठलरूपात एक झाले आहेत. ज्ञानी व ध्यानी याचे जे ज्ञेय व ध्येय आहे. ' तें हे समचरण उभे विटेवरी । पहा भीमातीरी विठ्ठलरूप ' असे त्याचे वर्णन करतात. त्या परब्रह्माचे सगुणरूप वर्णन करताना नामदेव म्हणतात –

'कस्तुरी कुंकुम रेखे लाल टिळा। केशराची उटी सर्वांगासी॥
पाहिला पाहिला माझा पांडुरंग । जीवीं जिवलग डोळे भरी ॥
हार शोभे गळा मंजुरीचा तुरा । कर्ण रत्नकळा झळाळित ॥
विटेवरी नीट गोमटी पाऊलें । त्यावरी ठेविले मस्तक ज्यां ॥
नामयाचा धणी मकेला ते धाला। आनंद दिवाळी आजी झाली ॥'

त्याचे सगुण रूप वर्णन करून सुद्धा तो ' दुरी ना जवळी त्रिपुटी वेगळा ' आहे याची जाणीव त्यांनी सतत बाळगलेली आहे. नामदेव सगुण विठ्ठलाची उपासना करणारे होते. परंतु विसोबा खेचरांकडून त्यांना ज्ञानाचा डोळा प्राप्त झाल्यानंतर ते या सगु-

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


णात ' निर्गुण ' अनुभवायला लागले.' तुज सगुण म्हणो की निर्गुण रे । सगुण निर्गुण एक गोविंदु रे ' अशीच त्यांची धारणा होती. विठ्ठल हे निर्गुणनिराकार सावळ्या परब्रह्माचे प्रतीक आहे, हे ध्यानात घेतल्यानंतर तो कर कटावर ठेवून आणि मौन धारण करून ' का उभा आहे, याची संगती लागते. तो निश्चल, अविनाशी नामरूपातीत–शब्दातीत आहे हाच त्याचा गूढ अर्थ आहे. आणि तो नामदेवांनी जाणलेला होता. म्हणून ते म्हणतात –

विठ्ठल कानडे बोलू जाणे । त्याची भाषा पुंडलीक नेणे ।।
युगे अठ्ठावीस झाली । दोघां नाही बोला बोली ।।
कर ठेवुनिया कटावरी । उभा भीवरेच्या तीरीं ।।
नामा म्हणे स्वामी माझा । उभा भक्तांचिया काजा ।। '
असे हे परब्रह्माचे प्रतीक सगुण साकार होऊन

' अठ्ठावीस युगे उभा ठेला द्वारीं । पुंडलिका वरी ठेवुनि लक्ष ।।
कृपेचा सागर भक्तजन वत्सल । आमुचा विठ्ठल मायबाप ।।
भक्तीसी भाळला अरूप रुपा आला। वेळाईत आला भक्तांलागी ।
भक्तीचिया रूपें न घडें तें केलें। वैकुंठा आणिलें भूमंडळीं ।।
भुक्ती मुक्ती सिद्धी त्या पायी लागतीं ।
उद्भट गर्जती विठ्ठल नामें ।।
नामा म्हणें केशव उदाराचा राव । सेवा चरणी ठाव देई आम्हां।। '

या विठ्ठलाच्या प्रेमभेटीसह जो पंढरीची वारी करतो त्याचे जन्ममरणाचे फेरे चुकतात, जन्ममरणाचे भय नाहीसे होते. म्हणून नामदेव सांगतात –

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


'सोडूनि पंढरीची वारी । मोक्ष मागती ते भिकारी ॥
ताट वोगरिलें निळे । सांडूनी कवण जाय भिकें ॥
जो नेणें नामगोडी । तोचि मुक्तीते चरफडी ॥
आम्ही पंढरीचे लाटे । नवजो वैकुंठीचे वाटे ॥
म्हणी म्याल गर्भवासा । नामा म्हणे विष्णुदासा ॥'

## बालक्रीडेचे अभंग

'नामदेवांचे बालक्रीडेचे २१२ अभंग आहेत. त्यांत श्रीकृष्णाचे बालपणापासून कंसवधापर्यंतचे चरित्र भागवताच्या आधारे दिले आहे. एकतर त्यांना कृष्णाच्या बालक्रीडेचे वर्णन करावयाचे होते आणि दुसरे म्हणजे येथून पुढील श्रीकृष्णचरित्राचा भाग महाभारताला अनुसरून येतो. म्हणून श्रीकृष्णांच्या बालक्रीडा एवढाच चरित्रभाग त्यांनी निवडलेला दिसतो. भागवतपुराण हा भक्तिप्रधान भागवतधर्माचा प्रमुख ग्रंथ होय. या भागवतग्रंथातील दशम स्कंधातील श्रीकृष्णचरित्राचा अभंगरूप अनुवाद नामदेवांनी केला. 'विश्वात्मा जो हरि । त्याची वर्णीन कीर्ती ' ही या रचनेमागील प्रमुख प्रेरणा दिसून येते. श्रीधर आणि बहिरंभट तथा बाहिरा जातवेद हे दोन अनुक्रमे संस्कृत आणि मराठी भागवत टीकाकार त्यांनी आदर्श म्हणून पुढे ठेवले होते, असे पुढील अभंगावरून दिसते —

'टीकाकार श्रीधर बहिरंभट चतुर । करा निरंतर कृपा मज ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



नामा मनी आठवी खेचर चरण। तयाच्या कृपेने सिद्धी जावे ॥'

श्रीधर हे हेमाद्री, बोपदेवांचे समकालीन ठरतात. ( इ. स. १२५० ते १३०० या दरम्यान ). या श्रीधर स्वामींचा आदर्श वाहिरंभटाने आपल्या भागवत टीकेसाठी पुढे ठेवला होता; आणि वाहिरंभटाचा आदर्श नामदेवांनी आपल्यापुढे ठेवलेला होता. वहिरंभटाचा दशमस्कंधावरील टीकेचा काळ इ. स. १३०० पूर्वीचा मानला जातो. अशाप्रकारे नामदेवांच्या बालक्रीडेच्या अभंगांना अप्रत्यक्षरीत्या श्रीधरी टीकेची आणि प्रत्यक्षरीत्या वाहिरंभटाच्या टीकेची प्रेरणा लाभलेली दिसून येते. वाहिरंभटाच्या प्रतिभासंपन्न, भावसमृद्ध, आत्मस्पर्शी आणि रसाळ वाणीचा कृष्णकथाकार नामदेवांनी आपल्यापुढे आदर्श म्हणून ठेवला असल्यामुळे आणि त्यांच्याही अंतरीच्या असीम भावुकतेमुळे बालक्रीडेचे अभंग अमृताचे पान घडविणारे आणि परतत्त्वाची अनामिक ओढ लावणारे ठरले आहेत. नामदेवांनी हे अभंग गुरुकृपा प्राप्त झाल्यानंतर लिहिलेले आहेत असे वर निर्देशिलेल्या अभंगात 'नामा मनी आठवी खेचर चरण' या चरणावरून सिद्ध होते.

'बालाजी' किंवा 'व्यंकटेश' हे विष्णूच्या श्रीकृष्णावताराचे बालस्वरूप आहे. व्यंकटेश हे रांगणाऱ्या श्रीकृष्णाचे नाव आहे आणि हा लंगडा श्रीकृष्ण महाराष्ट्रीयांच्या देव्हाऱ्यात विराजमान झालेला आहे. कर्नाटकातून महाराष्ट्रात पंढरपुरास आलेला श्रीविठ्ठलही श्रीकृष्णाचेच बालस्वरूप आहे; आणि त्यामुळे निवृत्ती, ज्ञानदेव आणि नामदेव या विठ्ठलभक्तांनी बालक्रीडेचे अभंग

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



मोठ्या आवडीने गायिलेले दिसून येतात. कृष्णावतार कसा झाला येथपासून कथेला प्रारंभ होतो. पुढे आठ वर्षांच्या बालकृष्णानं वसुदेवाला दिलेलं दर्शन, महाबळभटाची कथा, पेंद्याचे बोबडे भाषण, बाळकृष्णाच्या खोड्या, गौळणींची गान्हाणी इत्यादी विनोदप्रचुर कथाही यात आल्या आहेत. मूळ भागवतात नसलेला राधाविलास यात नामदेवांनी वर्णिलेला आहे. कृष्णाने गोपिकांसह केलेल्या क्रीडेचे वर्णन नामदेव करतात –

'कामाग्नीने कृष्णा पीडिलो सकळ । मांडियेला खेळ मन्मथाचा ।।
एक एक नारी एक एक कृष्ण । करावया इच्छा पूर्ण त्यांची ।।
प्रकृतीसी ऐसा भुलला गोविंद । करिती आनंद नामा म्हणे ।।
कामाग्नीने आम्ही जळतो सकळ । करावे शीतल अधरामृताने ।।'

अर्थात् परमात्मतत्त्वच कृष्णरूपानं गोकुळात अवतरले आहे ह्या भूमिकेत नामदेव ही वर्णने करीत असल्यामुळे 'काम' या शब्दातून सूचित होणारे मीलन हे आत्मा परमात्मा यांचे मीलन आहे हे अनुसंधान त्यांनी सुटू दिले नाही. तात्पर्य, नामदेवांचा हा वेध लावणारा श्रीकृष्ण 'परब्रह्म निष्काम' आहे.

नामदेवांच्या कवित्वाची, कारुण्यभावाची आणि कवित्व-शक्तीची यथार्थ कल्पना आणून देणारा त्यांचा 'बोबडा' पेंद्या चित्ताचा ठाव घेतो. स्वतःच्या मनावर इंद्रियवृत्तीवर ओढाळ गायींचे रूपक रचून हा बोबडा सवंगडी कृष्णाला म्हणतो –

'कुत्ना थमालले थमाल आपुल्या गाई ।
आम्ही आपुल्या घलासी जातो भाई ।। धृ० ।।

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



तुम्ही थोलल्या पातलाचे लेक्र ।
तुम्हांमधीं ले मी गलीब हाये येक ।।
मदला म्हणता जाई गाई लाख ।
किती धावू ले कांता लागला पाई ।। १ ।।
फाल बलाचि ले बलाचि खवलस केला ।
तुम्ही सलवांनी फाल फाल घेतला ।
मी गलीब ले म्हनूनि थोलका दिला ।
तूं म्हनशील ले 'याला कलताचि नाही' ।। २ ।।
कृष्ण म्हणे 'रे उगा राहि वेंधड्या ।
तुझ्या गाई रे मीच वळवितो गड्या ।
नाहीं तर धाडिन रे गोपाळांच्या जोड्या ।
नामा म्हणें रे गोष्ट रोकडी पाही ।। ३ ।।

कृष्णभक्तीवर आधारलेले नामदेवांचे हे बालक्रीडेचे अभंग हृदयाचा ठाव घेणारे आहेतच, परंतु निवृत्तिनाथांप्रमाणे कृष्णचरित्र कथेद्वारे मनावर पारमार्थिक संस्कार समर्थपणे करणारे आहेत.

नामदेवांच्या काही 'गौळणी' आणि 'विरहिण्या' ही चित्ताचा वेध घेणाऱ्या आहेत. या गौळणींत ते कृष्णाच्या सगुण रूपाला जसें आळवतात तसेंच त्याच्या निर्गुण, निराकार परब्रह्माचेही अवगाहन करताना दिसतात. खरें म्हणजे गौळणी या इंद्रियवृत्तींवर केलेले रूपक आहे; याची जाणीव त्यांच्या गौळणींतून होते. प्रथम कृष्णाच्या सगुण बालरूपाचं वर्णन करणारी एक गौळण पाहू –

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



परब्रह्म निष्काम तो हा गौळिया घरी ।
बाळयावाळे अंदुकृष्ण नवनीत चोरी ॥ १ ॥
म्हणती गौळणी हरीची पाऊले धरा ।
रांगत रांगत येतो हरी हा राजमंदिरा ॥ २ ॥
लपत छपत येतो हरी हा राजभुवनी ।
नंदासी टाकुनी आपण बैसे सिंहासनी ॥ ३ ॥
सांपडला देव्हारीं यासी बांधा दाव्यांनी ।
शंखचक्र गदा पद्म शारंगपाणी ॥ ४ ॥
बहुता कष्टें बहुता पुण्यें जोडले देवा ।
अनंत पत्राडें तुमचं न कळती मावा ॥ ५ ॥
नामा म्हणें केशवा अहो जी तुम्ही दातारा ।
जन्मोजन्मी द्यावी तुमची चरणसेवा ॥ ६ ॥

बालकृष्णाचं रूपवर्णन दृक्प्रत्ययी वाटतं. हे बाळरूप गौळण वाचताना रांगत-रांगत आपल्यासमोर येताना दिसतं. त्या रूपाला आपलंही मन लोभावतं. त्याचप्रमाणं नामदेवांच्या काही विरहिण्याही चित्तवेधक आहेत. ‘ जातो भगवंता मथुरेसी ’, मथुरेला श्रीकृष्ण गेल्यावर गोकुळवासी यांची विरहानं झालेली शोकाकुल स्थिती, श्रीकृष्णानं उद्धवाला गोकुळवासीयांचं सांत्वन करायला सांगितलेला निरोप इत्यादी विरहिण्यात विरहातून अनुभवाला येणारी उत्कट भक्ती नामदेवांनी साक्षात् केलेली दिसून येते. विशेषतः कृष्णाच्या आज्ञेनुसार उद्धव जेव्हा तेथील गोप–गोपिकांचं सांत्वन करायला म्हणून गोकुळात येतो तेव्हा नंद धावत जातो आणि ‘ सुखी आहे कृष्ण मथुरेत ? ’ असा प्रश्न विचारणारा नंद खोडी करू नको म्हणून आपण दटावले, म्हणून हे तान्हे रुसून गेले काय ? मी निर्दय पापिणीनं उखळाशी बांधला म्हणून हा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



माझ्यावर रुसून गेला काय ? अशा शंका विचारणारी शोकाकुल यशोदा उद्धवाचे चरण धरून —

‘ आम्हुचे स्मरण करितसे ? ॥
स्वरूपहीन आम्ही कंसदासी ।
म्हणुनी तुजसी पुसतसो ॥
आम्हांसाठी तेथें जाऊनिया म्हण ।
एकदा चरण दावी सर्वां ॥
मेल्या त्या गोपिका त्यांची राख झाली ।
वाजवी मुरली तया जगी ॥ ’

अशी आपली अगतिकता व्यक्त करणाऱ्या गोपिका, ‘ आम्ही मरून आमची राख झाली आहे, तू आपली मुरली वाजवून आम्हाला संजीवन दे ’ असं म्हणणाऱ्या कंसदासी आणि गोपिका दासी, पशू, पक्षी या सर्वांना श्रीकृष्णाचं कुशल सांगून ‘ असो द्यावा भाव कृष्णा पायी ’ म्हणून त्या सर्वांना निरोप घेणारा उद्धव ही सारी कृष्णभक्तीची एकेक जिवंत प्रतीके वाटू लागतात. या सर्वांच्या विरहावस्थेच्या वर्णनातून नामदेव स्वतःच विरही बनून उत्कट कृष्णभक्ती अनुभवताना दिसतात.

## चरित्रकार नामदेव

आदी, समाधी आणि तीर्थावळी अशा तीन प्रकरणांत लिहिलेले साडेतीनशे अभंगांचे ‘ ज्ञानदेवचरित्र ’ नामदेवांच्या नावावर मोडते. अनेक विद्वानांनी हे चरित्र ज्ञानदेवकालीन नामदेवाने लिहिले नसावे, असे मत त्यातील भाषा, अद्भुत वर्णने आणि शैली इत्यादींच्या आधारे व्यक्त केले आहे. काहींच्या मते तीर्थावळी हे प्रकरण

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



नामदेवकृत पहिल्या दोन प्रकरणांस कुणीतरी नंतर जोडलेले आहे. तथापि नामदेव हे एक आद्य कीर्तनकार होते; आणि हे चरित्र एका कीर्तनकारानं लिहिलेलं आहे, हे ध्यानात घेतलं तर या चरित्रावर नामदेवांच्या कर्तृत्वाविषयी घेण्यात आलेल्या शंका दूर होतील. दुसरे असे की, या तिन्ही प्रकरणांत एकाच कविमनाचं दर्शन घडतं. त्यामुळे ही प्रकरणं ज्ञानदेवकालीन नामदेवानंच लिहिली आहेत, असं गृहीत धरायला काहीच हरकत नाही.

यांतील पहिल्या दोन प्रकरणांत ज्ञानदेवादी चारी भावंडांचा पूर्ववृत्तांत, जन्म, बालपण, त्यांना सोसावी लागलेली जननिंदा, त्यांच्या अंगचे योगसामर्थ्य इत्यादी त्यांच्या लौकिक आणि अलौकिक गोष्टी नामदेवांनी रसाळ भाषेत वर्णिल्या आहेत. अद्भुतांचा किंवा चमत्कारांचा आश्रय कीर्तनकाराच्या शैलीला अनुलक्षून सर्वत्र घेतलेला असला तरी त्या अद्भुतातही वास्तवाचे, इतिहासाचे धागे-दोरे सापडू शकतात. कीर्तनकाराची चमत्कारांचा आश्रय घेणारी शैली त्यांनी सर्वत्र वापरली असली तरी सत्याचा विपर्यास हेतुतः केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे आदि आणि समाधी ही दोन्ही प्रकरणे ज्ञानदेव-चरित्राची साधने म्हणून आजही आधाराला घेतली जातात. ज्ञानदेव आणि नामदेव हे या प्रकरणात परस्परांशी एकरूप झालेले जिव्हाळ्याचे पारमार्थिक म्हणून आपल्याला भेटतात.

तीर्थावळी हे प्रकरण अद्भुतानं किंवा चमत्कारांनी खच्चून भरलेले आहे. विठ्ठल हा अगदी माणसासारखा या संत मंडळीत

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



वावरताना दिसतो. तथापि या साऱ्या गोष्टी नामदेवांच्या कमालीच्या भावुक मनाचे खेळ आहेत, असेच शेवटी म्हणावे लागते. काहीजणांनी या प्रकरणास 'तीर्थावळाची कादंबरी' असे म्हटले आहे. परंतु ती कादंबरी वाटली तरी ती 'ऐतिहासिक कादंबरी' आहे, या दृष्टीने पाहिले तर इतिहासाचे काही धागे हाती लागायला काहीच हरकत नाही. एकदा नामदेवांचे भेटीस ज्ञानदेव आले व परस्परांचे भेटीचे - सहवासाचे सुख परस्परांनी घेत घेत भूतळींची तीर्थे पहावी असे आपल्या मनीचे आर्त व्यक्त केले. त्यावर नामदेव म्हणाले, 'त्रिभुवनीचे वैभव दूर सारून मी पंढरीचा भिकारी झालो आहे. या विठोबाचे पायी कल्पतरूची छाया आणि कामधेनूचे दुभते मला सदैव प्राप्त होत असते. तेव्हा तीर्थयात्रा कशासाठी करायची ? मी विठोबाचा पाळिला - पोशिला आहे. त्याला कायावाचामने विकलो आहे. पांडुरंग हेच माझे सर्व सुख झाले आहे.' परंतु शेवटी विठ्ठल जेव्हा 'प्रत्यक्ष परब्रह्म मूर्तीच असे ज्ञानदेव तुझा सहवास इच्छितात, हे तुझे भाग्य आहे, तू त्यांच्या समवेत अवश्य जा.' असे सांगतात, तेव्हा नामदेव ज्ञानदेवांबरोबर तीर्थयात्रेस जातात, असें सुरुवातीसच वर्णन आले आहे. यातून नामदेव ज्ञानदेवांबरोबर तीर्थयात्रेस गेले होते, हे ऐतिहासिक सत्य हाती लागत नाही काय ? तीर्थावळीत ज्ञानदेव नामदेवांचे संवाद घातले आहेत. काहींना ते वास्तव वाटत नाहीत. पण त्या संवादातून भक्त नामदेवांचे थोर भक्त म्हणून ज्ञानदेवांचे ज्ञानी आणि श्रेष्ठ योगी पुरुष म्हणून दर्शन घडते, ते अनैतिहासिक कसे असू शकेल ? ज्ञानदेव, नामदेव, परिसाभागवत, विसोबा खेचर, सावता माळी, चोखामेळा या सर्व संतांनी एकत्र येऊन

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



तीर्थयात्रेच्या निमित्तानं लौकिकाच्या पलीकडचं अनुभवलेलं सुख नामदेवांनी कल्पनेच्या, चमत्कारांच्या, अद्भुताच्या आश्रयानं वर्णन केलेलं आहे. शैली कीर्तनकाराची, मन कवीचं आणि अंतः-करण निःसीम भक्ताचं, अशा नामदेवांनी लिहिलेली ही तीर्था-वळी आहे, हे ध्यानात घेऊन त्याकडे पाहिल्यास संतसहवासाचे पारमार्थिक सुख आपल्यालाही लाभेलच, परंतु या संतवर्यांच्या व्यक्तिचे अनेक पैलूही आपणास त्यातून ज्ञात होतील.

'नामदेवांची आड' हेही एक प्रकरण नामदेवांच्या नावावर मोडते. परंतु त्याचे नामदेव-कर्तृत्व साशंक आहे.

## ग्रंथसाहेबातील नामदेव

आयुष्याच्या उत्तरार्धात नामदेव उत्तर भारतात भक्तिमार्गाचा प्रसार आणि प्रचार करीत होते. त्या सुमारास त्यांनी तिकडच्या हिंदी भाषेत काव्यरचना केली. त्यातील एकसष्ट पदांचा समावेश शिखांच्या 'ग्रंथसाहेब' या धर्मग्रंथात समाविष्ट झालेला आहे. पंजाबमध्ये नामदेवांच्या व्यक्तित्वाचा प्रभाव किती जबरदस्त पडलेला होता, त्याचे हे प्रतीकच म्हणावे लागेल. ही हिंदी पदे 'भक्त नामदेव की मुखबानी' म्हणून प्रसिद्ध आहेत. या पदां-तील भावना, शैली, भाषा, कल्पना मराठीतील नामदेवांच्या काव्याशी ताडून पाहता एकमेकांशी जुळताना दिसून येतात. तेव्हा दोन्ही एकच कविमन किंवा भक्ताचे अंतःकरण आहे, याविषयी शंका राहात नाही. 'पतितपावन माधउ बिरदु तेरा।' 'पतित

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



पावन ब्रीद सोडी आता ' या दोन चरणांत किती साम्य आहे ! अशी अनेक साम्ये दिसून येतात. ' मनु मेरी गजु जिह्वा मेरी काती ' असं म्हणणारा कवी ' शिंपियाचे कुळी जन्म मज जाला ' अशीच आपली माहिती मराठीत देतो. तात्पर्य, मराठीतील भक्त नामदेव ग्रंथसाहेबातील नामदेव एकच आहेत. मनरूपी गज आणि जिव्हारूपी कात्री यांच्या सहाय्याने आपण मायेचा पाश कसा कापून टाकतो, ते एका पदात रूपकाच्या आधारे नामदेव सांगताना म्हणतात –

' मनु मेरी गजु जिह्वा मेरी काती ।
मपि मपि काटऊ जमकी फासी ॥
कहा करुऊ जाती कहा करुऊ पाती ।
राम को राम जपऊ दिन राती ॥
रांगनि रांगाऊ सीवनी सीवऊ ।
रामनाम बिनु घरिअ न जीवऊ ॥
भगति करऊ हरिके गुन गावऊ ।
आठ पहर अपना खसमु धिआवऊ ॥
सुईनेकी सुई रुपेका धागा ।
नामे का चितु हरिसऊ लागा ॥ '

ग्रंथसाहेबातील नामदेवांच्या पदांत व्यक्त होणारे पारमार्थिक मन पाहिले म्हणजे ते साधकाचे आहे असे वाटत नाही तर सिद्ध अशा साक्षात्कारी संताचेच आहे, असे त्यातील गूढ अशा आध्यात्मिक अनुभूतीवरून स्पष्टपणे दिसून येते. यावरून मराठीतील नामदेवच आयुष्याच्या उत्तरार्धात उत्तरेस गेले आणि त्यांनीच ही हिंदी पदांची रचना केली, या विषयी शंकेला जागा राहात नाही.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


# इतर हिंदी पदे

ग्रंथसाहेबातील हिंदी पदांत पाच–सहा वेळाच फक्त विठ्ठल किंवा गोविंद यांचा उल्लेख येतो. परंतु इतरत्र सर्व पदांत राम हे उपास्यदैवत असलेले दिसते. ही वस्तुस्थिती नाकारता येणे शक्य नाही. पण तेवढ्यावरून हे दोन वेगळे नामदेव होते, असा निष्कर्ष निघू शकत नाही. कारण राम, कृष्ण, विठ्ठल ही एका विष्णूचीच रूपे आहेत, अवतार आहेत, ही एकात्म भावना नामदेवांच्या हिंदी आणि मराठी पदांतूनही व्यक्त झालेली आहे. उत्तरेकडील साधकांच्या भावविश्वात एकच परब्रह्म रामरूपानं नटलं आणि म्हणून तेथील वास्तव्यात नामदेवांनीही आपल्या अंतरी साकार झालेल्या एकमेवाद्वितीय परब्रह्माचा नामनिर्देश 'राम' असा केला, एवढाच याचा अर्थ. नामदेवांना प्रिय असलेले विठ्ठलनाम आणि विठ्ठलरूप हिंदी वाणीतही तितक्याच उत्कटतेनं व्यक्त झाले आहे.

'बिठलु मैला काइ करउ ।
ईभै बीठलु उभै बिठलु, बिठलु बिनु संसार नाही ।।
नामेचे सुआमी बीठलो ।
तिऊ नामे मनि बीठुला ।
बाप बीठुला बाह दे ।
मेरो बापु माधउ धन कैसो । सांवला ओ बीठुलाइ ले ।।
देखउ तेरा हरि बीठुला ।
मोकउ बाह देहि बाह देहि बीठुला ।'

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


एका हिंदी पदांत तर नामदेवांना प्राणाहूनही प्रिय असलेल्या पंढरीचा साक्षात् उल्लेख आलेला आहे. 'अधम असोच भ्रष्ट बिभचारी। पंढरीनाथ कौ लेहि जु नामा ॥ किंवा 'नामदेव कहै ये सेष सरापी। पुंडरीनाथ न सुमिरै पापी ॥' एका पदात तर नामदेवांनी आपुले गुरु विसोबा खेचर यांचा स्पष्ट उल्लेख केला आहे. मन मेरी सुई तनो मेरा धागा। खेचरजी के चरण पर नामा। यावरून ज्ञानदेवकालीन नामदेव आणि उत्तरेत पंथ-प्रचारार्थ गेलेले नामदेव एकच ही गोष्ट सिद्ध होते.

नामदेवांच्या या हिंदी अभंगांत भक्त नामदेवांचं भक्तिभावानं ओथंबलेले अंतःकरण दिसतंच,परंतु या अभंगातून व्यक्त होणारी त्यांची आध्यात्मिक दृष्टी महत्त्वाची वाटते. आयुष्याच्या या उत्त-रार्धात नामदेव ज्ञानी आणि साक्षात्कारी सिद्ध बनले होते, याची ती खूण आहे. असे असूनही अंतरीची परमात्मभक्ती या सिद्धा-वस्थेत कुठेही आटलेली किंवा गोठून गेलेली दिसत नाही. भक्ति-प्रेमाचे पाझर पहिल्यासारखेच शुद्ध, निर्मळ आणि प्रवाही आहेत. त्यांच्या मराठी काव्यात विठ्ठल हे उपास्य दैवत प्राधान्य पावले आहे आणि राम हे दैवत विशेषकरून नाममहात्म्य गाताना आदरिले गेले आहे, तर हिंदी काव्यात राम हे दैवत प्राधान्य पावले आहे; आणि विठ्ठल हे दैवत अधूनमधून वाहिले गेले आहे. याचा अर्थ हाच की, श्रीविठ्ठल आणि श्रीराम ह्या उपास्य दैवतांची एकरूपता त्यांच्या भावविश्वात भिनलेली होती. एका मराठी अभंगात ते रामाला आळविताना म्हणतात —

'देवाचें हें गुज सकळ मंत्रमय। जे कां नित्य ध्येय शंकराचें।।
तें हें रामनाम सेवितां सर्वभावें। रामरूप व्हावें निश्चयेसी ।।'

असे अनेक अभंग काढून दाखविता येतील. त्याचप्रमाणे हिंदी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



अभंगात व्यक्त झालेली त्यांची विठ्ठलभक्ती यापूर्वी आपण पाहिलेली आहेच.

जातीपातींचा क्षुद्र विचार त्यांनी केव्हाच फेकून दिला होता. एक रामनामाच्या आधारे जीवनातले सारे द्वैतभाव नाहीसे होतात, सारी दुःखे समूळ नाश पावतात, अशी त्यांची श्रद्धा आहे. म्हणून ते म्हणतात –

'कहा करउ जाती कहा करउ पाती ।
रामको नाम जपउ दिन राती ॥'

त्यांचं सारं जीवन राममय होऊन गेलं होतं. रात्रंदिवस, कामधंदा करीत असतानाही रामनाम ढळलं नाही. श्वास आणि निश्वास रामनाम घेऊनच होत होते –

'रांगनि रांगउ सीवनि सिवउ ।
रामनाम बिन घरि अन जीवउ ॥
भगति करउ करिके गुन गावउ ।
आठ पहर अपना खसम धिआवउ ॥'

ज्याच्या श्वास आणि निश्वासाबरोबर रामनाम उच्चारले जाते, ज्याला नित्य कर्तव्यकर्मे किंवा कामधंदा करतानाही रामनाम आठवते, त्याच्या या अवस्थेला 'सहज समाधी' च म्हटले पाहिजे. नामदेव ही समाधीची अवस्था जगत होते.

## नामदेवांची उपदेशवाणी

परमार्थी मनुष्य अंतर्मुख वृत्तीचा असतो. असा अंतर्मुख मनुष्य परमार्थाच्या प्राप्तीसाठी आत्मनिरीक्षण आणि आत्मपरीक्षण

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



करून स्वतःचे दोष, स्वतःच्या चुका, स्वतःचे दुर्गुण किमान देवापुढे व्यक्त करतो. त्यामुळे त्याची अंतःशुद्धी होते आणि इथून पुढील त्याचं अंतर्बाह्य आचरण नीतिशास्त्राला अनुसरून होऊ लागतं. संतांचं अशाप्रकारे नीतीन्यायाला अनुसरून होणारं आचरण हेच त्यांचं खरं नीतीशास्त्र खऱ्या अर्थानं व्यक्त होताना दिसतं. तथापि स्वतः जे आचरिले ते इतरेजनांस सांगावे ह्या उदात्त हेतूने प्रेरित होऊन आणि आत्मनिवेदनाच्या अनिवार प्रेरणेने प्रेरित होऊन त्यांनी इतरांना जे नीतिशास्त्र उपदेशिले त्याचा उपदेश महत्त्वाचा ठरतो. कारण हे स्वानुभवाचे कथन असल्यामुळे त्याचे तेज आणि त्याचा प्रभाव लोकमानसावर पडून तेही सन्मार्गाला लागण्याची शक्यता असते.

नामदेवांनी वेगळे असे नीतिशास्त्र सांगितले नाही. कीर्तनाच्या रंगात आत्मनिष्ठ भूमिकेवरून त्यांनी जे स्वानुभव सांगितले, त्यांनाच नीतिशास्त्राचे मोल प्राप्त झाले. प्रत्येकाने आपल्या जीवनाचा विचार केला पाहिजे, जीवनाचा अर्थ शोधला पाहिजे. आपल्या जीवनाला काही अर्थ प्राप्त करून दिला पाहिजे. अन्यथा वाऱ्यावर उडत जाणाऱ्या पाचोळ्याप्रमाणे आपले आयुष्य भरकटत जाईल. म्हणून नामदेव सांगतात, ‘ जेथे नित्य नवी वासना वाढत असून क्षणाक्षणाला आयुष्य कमी होत आहे, अशा या संसारात आपण कोणाच्या भरंवशावर निश्चित आहात ? पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणे काळाचे मातुके असे हे शरीर पाहता पाहता मरणाधीन होते, हे तुम्हांस दिसत नाही काय ? संसार हा ‘ दो दिसांचा पाहुणा ’ असून एकदा का हे आयुष्य काळाच्या हाती गेले की ते आजवरचे ‘ पाळिले पोशिले आप्त जन ’ पाठमोरे होतील

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


आणि पाप-पुण्य हीच दोन 'अंतीची सांगाती, उरतील याची जाणीव असूनही अजून तुम्हीं देवविन्मुख का ?'

संसारात राहून जर देव सापडता तर शुकादि साधू घराश्रमाचा त्याग का करिते ? संसार पोहून जाणारा एखादा संत विरळा. तेव्हा इंद्रिये सर्वांगसाजिरी आहेत तोच सावध व्हा, काही धावाधाव करा, आणि 'एकलेचि येणें, एकलेचि जाणें' हा येथील न्याय आहे, हे ओळखून हरिभक्तीस लागा. 'आत्मारामाची' ओळख करून घ्या.'

नामदेवांना प्रपंच सोडा म्हणून सांगायचे नाही. प्रपंच हा दुस्तर आहे, तापदायक आहे, पण तो अटळही आहे, हे ओळखून त्यात कायमचे अडकून न पडता, तो लीलया पार करा व त्यातून मुक्त व्हा, असे त्यांचे सांगणे आहे. ते म्हणतात की, 'वाटसरूने एखाद्या वस्तीस यावे आणि सकाळी उठून ती वस्ती ज्या निर्लोभ मनानं सोडून निघून जावे, त्या निर्लोभ मनानं प्रपंच करा. संसारात राहून संसाराची सोडवण करा आणि फुटल्या घटाची चिंता नसावी, त्याप्रमाणे त्या वावग्या पसाऱ्याची चिंता न करता देवाला शरण जा.'

चित्तवृत्ती परमेश्वराकडे ठेवून प्रपंच कसा करावा याविषयी नामदेव म्हणतात, 'दुडीवर दुडी घेऊन पाण्यास निघालेली गुजरीण मोकळ्या हातांनी चालत असली तरी तिचे लक्ष जसे वर असते, किंवा दोरी हातात असताना लक्ष मात्र वर आकाशात उडणाऱ्या वावडीवर जसे असते, त्याप्रमाणे देह कोणत्याही व्यापारात असला तरी लक्ष मात्र त्या सर्वेश्वरावर असावे.' तात्पर्य, 'संसारी असावे, असोनि नसावे' असे संसारविषयक त्यांच्या उपदेशाचे सार आहे.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



परमार्थाच्या नावावर ढोंग करून जे इतरांना आणि मुख्य म्हणजे स्वतःलाही फसवतात अशांवर नामदेव आपले टीकास्त्र सोडतात. ते म्हणतात, 'सोंगाचे वैराग्य हे अनर्थाचं मूळ आहे. पोटासाठी हरिकथा सांगत फिरणे, हरिदर्शन न होता स्वतःस हरिभक्त म्हणविणे, देवावाचून कवित्व करणे, परमार्थाचं बीज न कळता हरिभक्तपणाचा ध्वज उभारणे, ही सारी लक्षणे आत्मघातकी आणि परघातकी आहेत.' 'संन्याशाचे सोंग आणता येईल पण प्रेमाचा अनुभव त्याने येईल का ? कीर्तनाचं सोंग आणता येईल, पण त्यानं खरे वैराग्य अंगी भिनणार नाही. पोटी परमार्थ, अंगी विरक्ती आणि मुखी नाम नसताना टिळे टोपीमाळा करून भोळ्या भाविकांस आपल्या मायापाशात अडकविणारे खरे भक्त नसून अभक्तच आहेत.'

खरा वैष्णव कोण याविषयी नामदेव सांगतात, 'विष्णूस भजून शिवाची उपेक्षा करणारे ते वैष्णव नव्हेत. कारण, हरिहरात अभेद असून दोहोंच्या ठायी एकच 'आत्माराम' आहे. वेदाध्ययन करून वैदिक, पुराण सांगून पुराणिक, कर्म आचरून कर्मठ, यज्ञ आचरून याज्ञिक किंवा तीर्थयात्रा करून कापडी होता येईल, परंतु यापैकी एकाही मार्गाने वैष्णव होता येणार नाही, तर हरिनाम घेणे हाच वैष्णव होण्याचा सर्वांत सोपा मार्ग आहे.' या ठिकाणी नामदेवांना बाह्य आचरणापेक्षा अंतःकरणवृत्तीतून प्रेमभावपूर्वक घेतलेल्या नामस्मरणाचे महत्त्व सांगायचे आहे. प्रेमरूप परमेश्वर प्रीतीनं, भक्तीनंच जोडायचा असतो, हा यातील विचार महत्त्वाचा ठरतो.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



अंतःकरणशुद्धी झाल्याशिवाय परमार्थ नाही हे सांगताना नामदेव म्हणतात, 'कामक्रोधादी विकार आणि दंभ जोवर गेलेला नाही, तोंवर लांब लांब गोष्टी सांगून काय उपयोग ? म्हणून बाह्य वेषाची चाड न बाळगता अंतरातच सुखाचे जे कारण आहे. ते ओळखून असावे. म्हणजे अंतरात्म्याला प्रत्येक कर्मात साक्षी ठेवावे. या अंतरात्म्याला जागृत करण्यासाठी हरिनामच केवळ उपयुक्त आहे.' प्रत्येकानं आपला 'स्वधर्म' ओळखला पाहिजे. तो कसा ओळखावा आणि आचरावा या विषयी ते म्हणतात, 'हरिनाम सतत ध्यावे, त्या आधी मनास मुंडावे, देहभाव सांडावा, वासना दंडावी आणि आत्ममय होऊन रहावे, यातच खरा स्वधर्म आहे.

बरे–वाईट, उदात्त-अनुदात्त या विषयीचा विवेक व्यावहारिक पातळीवरून सांगताना नामदेव म्हणतात, दुर्जनांना प्रथम टाळावे कारण, माशी जशी दुसऱ्याच्या पोटात जाऊन स्वतः मरते आणि दुसऱ्यास ओकवून कष्टी करते, त्याचप्रमाणे दुर्जनाची बुद्धी खोटी असून ती आपण मरून दुसऱ्यास मारणे, विंझ्याच्या डागा-प्रमाणें ती कदापीही शुद्ध होणार नाही, हे ओळखून 'दुष्ट तो दुर्जन दुरीच धरावा.'

'अभक्तांची भ्रांत संगत वर्ज्य करून सत्संग धरा स्वहित आचरा, विषयांचे कोडकौतुक करू नका, आयुष्य क्षणाक्षणाला झडते पण विषयवासना क्षणाक्षणाला वाढते तेव्हा विषयाची माजपण म्हणजेच परमार्थाची बुडवण आहे, हे ओळखून पर-नारीचा संग सोडा.' अशाप्रकारे नामदेव संसारात आचरावयाचे नीतिशास्त्र सांगतात आणि शाश्वत सुखाचे एक साधनच लोकांच्या हाती देतात.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai


# सत्त्वसंपन्न वारसा

नामदेवांनी तुमच्या-आमच्या हाती एक सत्त्वसंपन्न वारसा दिला आहे. परब्रह्माचं प्रतिक म्हणून विठ्ठलाची उपासना समत्व बुद्धीनं करायला सांगणारा एक मार्ग त्यांनी आपल्याला उपलब्ध करून दिला. या मार्गात उच्च-नीच, राजा-रंक, स्त्री-पुरुष असा भेद नाही. या मार्गात योगयागादी अवडंबर नाहीत. या मार्गात कोणतेही कर्मकांड सांगितलेले नाही. प्रपंचाचा त्याग करा असेही सांगितले नाही. उलट प्रपंच परमार्थमय करून टाका असेच सांगितले. कर्मत्यागापेक्षा परमेश्वरार्पण बुद्धीनं कर्मांचे आचरण करून कर्मातून मुक्त व्हा. हा मुक्तीचा मार्ग सांगितला. भक्ती हे जीव अतूट नातं जोडणारा सर्वस्पर्शी, सर्वगामी, साधं-सोपं साधन आपल्या हाती देऊन प्रीतीनं परमेश्वर जोडा असं सांगितलं. माणसांवर प्रेम करा, त्यानं त्याचा आत्मा संतुष्ट होऊन एका परीनं परमात्मा जवळ येतो, असा साधा-सरळ उपदेश केला. सर्वसामान्यांचे जीवन सहजपणे उजळून टाकणारा हा भक्तीमार्ग आचरावयास सांगून त्यांनी एक सत्त्वसंपन्न वारसा आपल्या हाती दिला आहे. त्यांनी दिलेला भागवताचा ध्वज चोखामेळ्याच्या खांद्यावर शोभून दिसला. सत्त्वसंपन्न जीवन आपण त्यांचा आदर्श पुढे ठेवून जगू लागलो तर आपल्यालाही जीवनात खरं सौख्य, खरी शांती लाभेल. नामदेवांनी दिलेला हा वारसा आपल्याला सांभाळायचा आहे. आपल्यालाही आपलं जीवन उजळून टाकायचं आहे. याची उत्कट जाणीव झाली तरच नामदेवांच्या ऋणातून आपण मुक्त होऊ.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



आपलं मराठी मन मुळात भक्तिप्रवण आहे. ईश्वरावर त्याची अतूट श्रद्धा आहे. या भक्तिप्रवण श्रद्धाळू मनाला नामदेवांविषयी अपार ओढ आहे. या विलक्षण ओढीचं कारण त्यांच्या आपल्या अंतःकरणवृत्तींत दडलेले आहे. नामदेवांचं मन तेच आपलं मन आहे. त्यांची दुःखं तीच आपली दुःखं आहेत. त्यांच्या मनाला लागलेली ओढ तीच आपल्याही मनाची ओढ आहे. आणि म्हणून आपल्याला नामदेव आपले जिव्हाळ्याचे सोबती वाटतात. आपल्या अंतरीचे आर्त ते बोलून दाखवतात. म्हणून ते आपल्याला आपलेसे वाटतात. जीवनासाठी आपण सारेच धावतो. या धावाधावीत आपल्याला कष्ट होतात, श्रम पडतात, कधी ठेचाळतो, कधी विसावतो. कधी आशेनं, कधी निराशेनं भारावून जातो, पण या जीवनाच्या वेड्यावाकड्या वळणाच्या, खाचखळग्याच्या वाटेवर आपल्याला नामदेवांसारखा असा मवाळ मनाचा, वाटसरू भेटतो की त्याच्या हळुवार फुंकर घालण्यानं त्या रक्तबिंदूचे मोती होतात. त्या वेळी होणाऱ्या वेदनेलाही अलौकिक सुखाचे वरदान प्राप्त होते आणि हे वरदानच देवाला वरदान मागायला लागते की हे देवा, जीवनातल्या या वेदना कधीच सरू देऊ नकोस. त्या वेदनांतील सुखच जन्मभर अनुभवू देत ! जीवनावर प्रेम करायला यापेक्षा आणखी कोणत्या रीतीनं कोण शिकवणार ? नामदेवांनी खऱ्या अर्थानं जीवनावर प्रेम करायला शिकवलं.

आपलं मन जीवनात ठेचा खातखात शेवटी परमेश्वराची वाट शोधायला धावतं. त्याही वाटेत अनेक खाचखळगे दिसू लागतात. न संपणारी ही वाट आहे असा अनुभव येऊ लागतो. त्या वाटेवरच आपलं प्रेम बसू लागतं. आणि वाट बनून परमेश्वराची वाट पाहू लागतो. शेवटी हृदयस्थ नारायण जागा होतो. आणि त्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



वाटेवरच आपल्याला आंजारतो, गोंजारतो आणि पुन्हा वाटचाल करायला लावतो. या वेळेची आपली ही वाट अनंताकडे नेणारी असते. वाटेवरच कुठेतरी शरीर गळून जातं आणि आत्मतत्त्व परमात्मतत्त्वात कायमचं विलीन होतं. जिवाशिवाची भेट या वाटेवर होते. या वाटेवरच नामदेवांसारख्या वाटाड्यानं कीर्तनाचे रंगी नाचत नाचत असंख्य ज्ञानदीप लावलेले असतात. म्हणूनच ही वाटचाल अनंत वाढली तरी अज्ञान राहात नाही. ज्ञात झालेल्या या वाटेवरच शरीर गळताना मन परमेश्वराला प्रार्थू लागतं —

तुझे चरण देखोनी हरली भवव्यथा ।
पुढती एक चिंता वाटे थोर ।।
झणी मज मुक्ती देसी पांडुरंगा ।
मग मी संतसंगा केवी मिळे ।।
पंढरीचा आनंद हा सुखसोहळा ।
कवणाचिया डोळां पाहो जाऊं ।।
तुझ्या कथा मज अमृत संजीवनी ।
कवणाच्या श्रवणीं ऐकों जाऊं ।।
म्हणोनि माझ्या जीवा वाटे जडभारी ।
उदास मुरारी करिसी झणी ।।
नामा म्हणे मज तुझी चरणसेवा ।
जन्मोजन्मी देवा द्यावी मज ।।

कारण, या वेळी आपलं आणि नामदेवाचं मन वेगळं राहिलेलं नसतं. नामदेवांच्या मनानंच आपण देवाला मागणं मागू लागतो की, हे देवा, आम्हाला मुक्ती देऊ नकोस. मुक्ती दिलीस तर जीवन उजळून टाकणारा संतसंग आम्हाला पुन्हा कसा मिळेल ?

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



अमृताहूनही संजीवनी असलेल्या तुझ्या कथा कोणाच्या कानांनी ऐकणार ? म्हणून मुक्तीपेक्षा जन्मोजन्मी तुझी चरणसेवाच दे. या वेळी मनाला वाटू लागतं की, मुक्तीपेक्षा पंढरीच्या पायरीचे चिरे होण्यातच शाश्वत सुख आहे. म्हणून मन आक्रंदून नामदेवांच्या भाषेत प्रार्थना करू लागतं –

'वैकुंठासी आम्हां नको धाडूं हरी ।
वास दे पंढरी सर्व काळ ॥'
'मरोनी जन्मावें पंढरीचे पारीं ।
व्हावें महाद्वारीं कृमी कीटक ॥
संतचरणरज लागे येता जातां ।
नामा म्हणें आतां हेंचि व्हावें ॥'
'नामा म्हणें आम्ही पायरीचे चिरे ।
संतपाय हिरे वरी देती ॥'

अशाप्रकारे पंढरीच्या पायरीचे चिरे होण्यात धन्यता मानणाऱ्या नामदेवांचं मन परमार्थाची वाटचाल करू लागलेल्या मनालाच जाणता येणे शक्य आहे. आजही या मनाला पंढरीच्या महाद्वारापाशी गेल्यावर असं दिसतं की, या द्वाराच्या पायरीशी

'स्फुंदत स्फुंदत नामा उभा महाद्वारीं ।
दृष्टी पायांवरी विठोबाच्या' ॥

—

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



# आरती श्रीपांडुरंगाची

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा । वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा । पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा । चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा । जयदेव जयदेव जय पांडुरंगा ॥ रखुमाईवल्लभा राहीच्या वल्लभा पावें जिवलगा ॥ जय० ॥ १ ॥ तुळसीमाळा गळा कर ठेवुनि कटीं । कासे पितांबर कस्तुरी लल्लाटीं । देव सुरवर नित्य येती भेटी । गरुड हनुमंत पुढे उभे राहती ॥ जय० ॥ २ ॥ धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा ॥ सुवर्णाची कमळें वनमाळा गळां ॥ राही रखुमाई राणी या सकळा । ओंवाळीती राजा विठोबा सांवळा ॥ जय० ॥ ३ ॥ ओवाळूं आरत्या कुर्वंड्या येती । चंद्रभागेमाजी सोडूनिया देती । दिंड्या पताका वैष्णव नाचती । पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥ जय० ॥ ४ ॥ आषाढी कार्तिकी भक्तजन येती । चंद्रभागेमाजी स्नाने जे करिती । दर्शनहेळामात्रे तया होय मुक्ती ॥ केशवासी नामदेव भावें ओवाळिती ॥ जयदेव ॥ ५ ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai



Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

श्रीनामदेव पायरी–समाधी